रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २१०
www.ramprahar.com

◆ सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



## महामुकाबल्यात भारतच किंग! पाकिस्तानचा धुव्वा

**श्रीलंका :** आर प्रेमदासा स्टेडियम येथे झालेल्या टी-२० विश्वचषक २०२६मधील २७वा सामना भारताने ६१ धावांनी आपल्या नावावर केला आहे. कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानला पराभवाची धूळ चारली असून टीम इंडियाची सुपर ८ मध्ये धमाकेदार एंट्री झाली आहे.

भारताने पाकिस्तानवर टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत ८-१ अशी आघाडी घेतली आहे. भारताने पाकिस्तानसमोर विजयासाठी १७५ धावांचे आव्हान दिले होते, पण पाकला हे आव्हान काही गाठता आले नाही. त्यामुळे त्यांचे खेळाडू झटपट तंबूत परतले. इशान किशनच्या दमदार फलंदाजीनंतर गोलंदाजांनी पाकच्या खेळाडूंना ११४ वर ऑलआऊट करून त्यांची जागा दाखवली.



# उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीमधील कनेक्टिव्हिटी होणार अधिक मजबूत

**नवी दिल्ली: वृत्त संस्था**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ने महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय महामार्ग-१६० ए च्या घोटी-त्र्यंबक (मोखाडा)-जव्हार-मानोर-पालघर या १५४.६३५ किमी लांबीच्या विभागाच्या पुनर्वसन आणि चौपदरीकरण सुधारणेला सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी एकूण ३,३२०.३८ कोटी रुपयांचा भांडवली खर्च अपेक्षित असून, यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीमधील कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे.

नाशिकच्या पश्चिम भागातील अंबड आणि सातपूर सारख्या औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या मालवाहतुकीमुळे सध्या नाशिक शहरावर वाहतुकीचा मोठा ताण येत आहे. सध्याची ही वाहतूक एनएच-८४८ मार्गे शहरातून जात असल्याने नागरी रस्ते कोंडीचा सामना करत आहेत. या नवीन प्रकल्पामुळे त्र्यंबक मार्गे औद्योगिक क्षेत्रांना एक सक्षम पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे शहरातील वाहतुकीचा ओघ कमी होईल. विशेषतः मुंबई आणि दक्षिणेकडून येणारी वाहतूक इगतपुरी इंटरचेंजद्वारे समृद्धी महामार्ग आणि पुढे एनएच-१६० ए चा वापर करून त्र्यंबक व नाशिककडे जलद गतीने पोहोचू शकेल. २०२८ पर्यंत या मार्गावरील वाहतूक प्रति दिन १०,००० वाहनांच्या पुढे जाण्याचा अंदाज असल्याने या चौपदरीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे.

हा प्रकल्प 'पीएम गतीशक्ती' तत्त्वावर आधारित असून, याद्वारे महाराष्ट्रातील ६ आर्थिक नोड्स, ७ सामाजिक नोड्स आणि ८ लॉजिस्टिक नोड्स जोडले जाणार आहेत. यात प्रामुख्याने तारापूर आणि बोईसर येथील सेझ, मोखाडा औद्योगिक उद्यान आणि वाडा येथील औद्योगिक वसाहतींचा समावेश आहे. तसेच त्र्यंबकेश्वर, जव्हार राजवाडा, वैतरणा नदी आणि अर्नाळा किल्ला यांसारख्या पर्यटन स्थळांनाही या महामार्गाचा मोठा लाभ मिळेल. पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील पायाभूत सुविधा सुधारल्यामुळे या क्षेत्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठी गती मिळणार आहे.

**४४ लाख व्यक्तींना रोजगार उपल्ब्ध होणार**

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा वेळ आणि वाहनांच्या देखभालीचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे ४४ लाखांहून अधिक व्यक्ती-दिवसांचा रोजगार निर्माण होणार आहे. हा महामार्ग पुढे दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे आणि वाढवण बंदरासारख्या महत्त्वाच्या केंद्रांशी जोडला जाणार असल्याने राज्याच्या लॉजिस्टिक कामगिरीत मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

## अतुल घरत यांच्या प्रयत्नातून कोळखेजवळील रस्त्याची डागडुजी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पळस्पे फाटाहून कोन रसायनीकडे तसेच रसायनी कोनहून पनवेलकडील रस्तावरुन वाहने ये जा करताना पळस्पे उड्डाण पुलाजवळच्या रस्त्याला खड्डे पडल्याने रस्त्याची चाळण झाली होती.यामुळे अपघातांची मालिका सुरूच होती.

शिवाय रस्त्यातील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा प्रचंड खोळंबा होऊन वाहनचालकांचा जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.या रस्त्यावरील खड्डे दुचाकीस्वारांसाठी मृत्युचा सापळा ठरल्याने कोळखेजवळील या उड्डाणपुलाच्या उतारावर लहानमोठ्या अपघातांची मालिका सुरूच आहे.हि समस्या नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते अतुल घरत यांना सांगताच त्यांनी तत्काळ आपल्या पत्नी नवनिर्वाचित भाजपच्या जिल्हा परिषद सदस्या हर्षदा अतुल घरत यांना सांगितली.यावेळी तत्काळ एमएमआरडी व सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी करुन विनंती केली.

शनिवार दि.१४ रोजी रात्री या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम सुरू होवून रविवारी पुर्ण झाले.




## हर्षवर्धन सकपाळांच्या फोटोला भाजपने मारले जोडे



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना क्रूरकर्मा टिपू सुलतान सोबत करणाऱ्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा नवी मुंबई भारतीय जनता पार्टी तर्फे जाहीर निषेध करण्यात आला. हर्षवर्धन यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करत नवी मुंबईतील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी आपला संताप व्यक्त केला. महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश अध्यक्षांच्या अशा वक्तव्यावरून काँग्रेसला महापुरुषांचा किती आदर आहे हे जनतेला समजते! महापुरुषांचा अपमान करणाऱ्या हर्षवर्धन सपकाळ यांचा जाहीर निषेध! हर्षवर्धन सकपाळ यांची प्रदेशाध्यक्ष पदावरून तात्काळ हकलपट्टी करावी व त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी या निषेध आंदोलनादरम्यान केली.

या प्रसंगी जिल्हा अध्यक्ष डॉ राजेश पाटील, कोकण संवादक अभिजित पेडणेकर, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष निकेतन पाटील, नगरसेवक निशांत भगत, माजी नगरसेवक संपत शेवाळे,नगरसेवक सुनील कुरकुटे,भाऊ भापकर, शिल्पा ठाकूर, शैला पाटील, राजेश ठाकूर, उर्मिला शिंदे,सुरेश शिंदे,उत्तर भारतीय मोर्चाचे राजेश राय, मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, संतोष नाईक,पंकज आंबेरकर, संतोष शेट्टी, सुरेश शिंदे नवी मुंबई भाजपा/युवा मोर्चा चे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'हिंद-की-चादर' शताब्दी समागमासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज

**नवी मुंबई: रामप्रहर वृत्त**

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद-की-चादर' शताब्दी समागमाच्या पार्श्वभूमीवर कोंकण विभागातील संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी अत्यंत काटेकोर, बहुस्तरीय आणि समन्वयित वैद्यकीय व्यवस्थापन उभारण्यात आले आहे.



दि. २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२६ रोजी ओवे मैदान, खारघर, नवी मुंबई येथे होणाऱ्या मुख्य सोहळ्यासाठी राज्यासह देशाच्या विविध भागांतून सुमारे १५ लाखांहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कोंकण विभागांतर्गत येणाऱ्या ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग आणि मुंबई या जिल्ह्यांत दि. १० ते २५ फेब्रुवारी या कालावधीत अखंड मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कोंकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल सूद गोयल तसेच मुख्यमंत्री कार्यालयातील या कार्यक्रमाचे राज्य समन्वयक डॉ. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य व्यवस्थापनाचा सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी जिल्हास्तरीय आरोग्य व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली असून, नियमित आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. या नियोजनात जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा सक्रिय सहभाग आहे. यासोबतच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेशी संलग्न खाजगी रुग्णालयेही आरोग्य सेवा देणार आहेत.

**कार्यक्रमस्थळी अत्याधुनिक आरोग्य सुविधा**

मुख्य कार्यक्रमस्थळी आवश्यकतेनुसार स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग उभारण्यात येणार असून, विविध तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत संसर्गजन्य आजारांची तपासणी, कर्करोग व दंतरोग तपासणी, महिलांच्या आजारांची विशेष तपासणी, नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप, ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्य साहित्य वितरण, मोफत वैद्यकीय सल्ला व औषधोपचार, २४ तास रुग्णवाहिका सुविधा व तातडीच्या संदर्भ सेवा दिल्या जाणार आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत मोफत नेत्र तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार असून, गरजूंना मोफत चष्मे तसेच तपासणीनंतर ज्येष्ठ नागरिकांना काठ्यांचे वितरण करण्यात येणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी खारघर व नवी मुंबई शहरातील प्रमुख प्रवेश मार्ग, वाहनतळ (पार्किंग) क्षेत्रे आणि तात्पुरत्या निवासस्थळी वैद्यकीय पथके, प्राथमिक उपचार केंद्रे आणि रुग्णवाहिका सेवा कार्यरत असणार आहेत. 'हिंद-की-चादर' शताब्दी समागमाच्या निमित्ताने कोंकण विभागीय प्रशासनाने उभारलेली ही आरोग्य व्यवस्था लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणारी आणि आदर्श ठरणारी असेल.

## ताज्या मासळीचे दर तिप्पट; हवामान बदलाचा फटका

**अलिबाग : प्रतिनिधी**

समुद्रातील ताज्या मासळीला सध्या प्रचंड मागणी असली तरी बदलत्या हवामानाचा मोठा परिणाम मासेमारी व्यवसायावर होत आहे. पहाटे गारठा आणि दुपारनंतर झपाट्याने वाढणारे तापमान असे विचित्र वातावरण सध्या अनुभवास येत असून, या चढउतारामुळे समुद्रातील मासळीची ठिकाणे शोधणे मच्छीमारांसाठी कठीण झाले आहे. परिणामी अनेक मच्छीमारांना मासळी न मिळाल्याने खाली हात परतावे लागत आहे.



हवामानातील बदलांचा फटका थेट तंत्रज्ञानालाही बसत आहे. मासे शोधण्यासाठी वापरले जाणारे 'फिश फाइंडर' किंवा 'इको साउंडर'सारखी सोनार तंत्रज्ञानावर आधारित उपकरणेही अपेक्षेप्रमाणे काम करत नसल्याचे मच्छीमार सांगतात. तापमानातील अचानक बदलामुळे मासे आपली ठिकाणे बदलत असल्याने रडारवर अचूक नोंद मिळत नाही, याचा परिणाम मासेमारीवर होत आहे. याचा थेट परिणाम बाजारपेठेत दिसून येत आहे. ताज्या मासळीचे दर सध्या तिप्पट वाढले असून सुरमय, पापलेट, कोळंबी यांसारखी लोकप्रिय मासळी सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. काही दिवसांपूर्वी चार पापलेट साधारण ४०० रुपयांना मिळत असत; मात्र त्याच आकाराचे पापलेट सध्या १,२०० रुपयांपर्यंत विकले जात आहेत.

एकाच दिवसात तापमानात मोठे चढउतार होत आहेत. सकाळी तापमान २३ अंश सेल्सिअसपर्यंत असते, तर दुपारनंतर ते ३० अंशांपर्यंत वाढते. यामुळे समुद्रातील मासे आपली ठिकाणे बदलतात. तसेच पौर्णिमेनंतर दशमीपर्यंत भांगाची भरती असल्यानेही मासेमारीवर परिणाम होत आहे. मात्र चार ते पाच दिवसांत परिस्थिती बदलल्यानंतर मासळी उपलब्ध होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

ताज्या मासळीला मोठी मागणी असल्याने बंदरात आलेली मासळी लिलावात हातोहात विकली जात आहे. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेत मासळी शिल्लक राहत नसल्याचे मासळी विक्रेत्या संगिता पेरेकर यांनी सांगितले. सद्याच्या हंगामात जवळा, कोळंबी, माकुल अशी मासळी मिळते. या मासळीला लिलावात जास्त मागणी नसल्याने ती बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होते, तर पापलेट,सुरमय यासारखे प्रकार स्थानिक बाजारात विक्रीसाठीशिल्लकच रहात नाहीत.एकूणच हवामानातील अस्थिरतेमुळे मच्छीमार आणि ग्राहक दोघांनाही सध्या महागाईचा सामना करावा लागत आहे.

> **मासेमारीला गेल्यानंतर डिझेल खर्च, नोकरांचा पगार, त्यांच्या जेवणाचा एका फेरीचा खर्च लाखापेक्षा जास्त होतो. हा खर्च भागेल इतकीही मासळी मिळत नसल्याने आम्ही नौका बंदरात नांगरुन ठेवल्या आहेत.**
>
> **-संजय डबरी, मच्छीमार**

## अष्टविनायक पालीत वाहतूक कोंडीची समस्या बिकट

### भाविक, पर्यटक आणि स्थानिक नागरिक हवालदिल

**पाली: प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रख्यात धार्मिक व अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात वाहतूक कोंडीची समस्या अत्यंत बिकट झाली आहे. मागील अनेक वर्षांपासून रखडलेला बाह्यवळण मार्ग (बायपास) अद्याप पूर्ण न झाल्याने भाविक, पर्यटक, प्रवासी आणि स्थानिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अरुंद रस्त्यातून अवजड वाहने काढताना चालकांची मोठी कसरत होत असून, या कोंडीमुळे शहराचा श्वास गुदमरत आहे.



शहरातील बल्लाळेश्वर मंदिर परिसर, ग. बा. वडेर हायस्कूल, जुने एस.टी. स्टँड, गांधी चौक आणि बाजारपेठ यांसारख्या अरुंद रस्त्यांवर नियमित कोंडी होते. डबर व खडी वाहतूक करणारे अवजड डंपर, नियमांचे उल्लंघन करून होणारी दुहेरी वाहतूक आणि रस्त्याच्या दुतर्फा असलेली अवैध पार्किंग यामुळे ही समस्या अधिकच जटील झाली आहे. अनेकदा महत्वाच्या वाहतूक पोलीस तैनात नसल्याने कोंडीत भर पडते, ज्याचा फटका रुग्णवाहिकांनाही बसत आहे. पालीतील अरुंद रस्ते, अतिक्रमणे, दुतर्फा पार्क केलेली वाहने व नियमांचे उल्लंघण करणारे वाहन चालक आणि महत्त्वाचे म्हणजे सतत होणारी अवजड वाहतूक यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. पोलिसांनी योग्य प्रकारे वाहतुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. नगरपंचायत ने रस्त्यावर आलेली अनधिकृत बांधकामे तोडली पाहिजेत.

पालीतील कोंडीवर रामबाण उपाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाह्यवळण मार्गाला मंजुरी मिळून १५ वर्षे उलटली आहेत. वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्ग ५४८ (ए) ला पाली-पाटणूस मार्गाशी जोडणारा हा रस्ता बलाप गावावरून थेट बल्लाळेश्वर मंदिराच्या पाठीमागे झाप गावापर्यंत जाणार आहे. यासाठी १८ कोटी रुपये रस्त्यासाठी आणि १० कोटी रुपये भूसंपादनासाठी मंजूर आहेत. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे आणि जमिनीचा मोबदला योग्य न मिळाल्याने शेतकऱ्यांचा विरोध असल्याने हे काम अद्याप कागदावरच आहे.

> **पालीतील महाकाली मंदिर चौक, छत्रपती संभाजीमहाराज चौक असे काही महत्त्वाचे रस्ते रुंदीकरण करण्यात आले आहे. तर ग. बा. वडेर हायस्कुल व बाजारपेठेत आदी ठिकाणचे रस्त्यावर आलेली बांधकामे मागे घेतली आहेत. सर्व मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन तसेच सर्व तांत्रिक अडचणी सोडवून बाह्यवळण मार्ग केल्यास पालीतील वाहतूक कोंडी कमी होईल.**
>
> **-सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, पाली**

## खालापुरात बम बम भोलेचा गजर; शिव मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी

**खोपोली: प्रतिनिधी**

महाशिवरात्री निमित्ताने तालुक्यातील पुरातन पेशवेकालीन शिव मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. खोपोलीतील प्रसिद्ध पेशवेकालीन वीरेश्वर मंदिरात पहाटे विधिवत पूजाअर्चा संपन्न झाल्यानंतर मंदिर दर्शनासाठी भाविकांना खुले करण्यात आले होते. दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांच्या रांगा लागल्या होत्या



तालुक्यातील तुपगाव येथील पेशवेकालीन धानेश्वर मंदिर परिसरात महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. यात्रेसाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने येतात. तुपगाव मातीच्या चुली, मडक तसेच विविध वस्तूंसाठी प्रसिद्ध असून यात्रेच्या दिवशी मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होते. खालापूर शहरातील बाराव्या शतकातील पुरातन शिव मंदिरात देखील भाविकाने दर्शनासाठी गर्दी केली होती.

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग लगत चौक या ठिकाणी प्रति बद्रीनाथ मंदिराची प्रतिकृती असून चाळीस फुटाची भव्य शंकराची मूर्ती चे दर्शन घेण्यासाठी भाविकांची रीघ लागली होती. रविवार असल्याने भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी बाहेर पडल्याने जागोजागी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## अंनिस कर्जत शाखेच्या अध्यक्षपदी विलास सांगळे



**कर्जत : पत्रकार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कर्जत शाखेची कार्यकारिणी निवड पार पडली. या वेळी अध्यक्षपदी विलास विठ्ठल सांगळे, उपाध्यक्षपदी अनिल शंकर थोरवे तर शाखा कार्याध्यक्षपदी सूर्यकांत नारायण भुतावळे यांची निवड करण्यात आली.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कर्जतच्या निवड संबंधी कोतवाल नगर मध्ये सभेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड यांनी अंनिसची त्रिस्तरीय संघटनात्मक रचना स्पष्ट केली. शाखा कार्यकारिणी दरवर्षी, जिल्हा कार्यकारिणी दोन वर्षांनी आणि राज्य कार्यकारिणी तीन वर्षांनी बदलते. अशी माहिती दिली. तसेच अंनिसची पंचसूत्री मांडून संस्था या तत्त्वांवरच कार्य करते, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रधान सचिवपदी विकास जगन्नाथ वाल्हे, महिला सहभाग विभाग प्रमुखपदी शितल जगन्नाथ गायकवाड, युवा सहभाग विभाग प्रमुखपदी अविनाश देवेंद्र दोंदे, विविध उपक्रम विभाग प्रमुखपदी गणेश लक्ष्मण गंगावणे, सोशल मीडिया विभाग प्रमुखपदी रोहिदास श्रीराम लोभी तर कायदेविषयक विभाग प्रमुखपदी ॲड. उज्वला देविदास पाटील यांची निवड झाली. विजय हरिभाऊ कोंडिलकर तसेच श्रीकांत विनायक हावरे हे सदस्य म्हणून कार्यरत राहणार आहेत. या बैठकीस जळगाव जिल्हा कार्याध्यक्ष प्रल्हाद बोऱ्हाडे तसेच महिला सहभाग विभागाच्या शोभा बोऱ्हाडे यांचीही उपस्थिती लाभली.

**दुखवटा**

### भाईसाहेब पाशिलकर



**धाटाव** : रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती भाईसाहेब पाशिलकर यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. शनिवार रात्री १०:३० वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.रायगडचे खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्या जाण्याने रायगड जिल्ह्यातील एक धुरंधर, लोकाभिमुख नेतृत्व हरपले असून त्यांच्या कार्याची आठवण चंद्र-सूर्य-तारे असेपर्यंत कायम राहील, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २१०
www.ramprahar.com
◆ सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

**अंतरंग**

उकिरड्यातूनही उगवतील उमेदीचे कोंब.../४
महालगुर-मोरेवाडी येथे बिबट्याची गायीवर झडप/५
जुगार, सट्टाबाजी करणाऱ्यांवर कारवाई/६

## भारतीय लष्करात स्वदेशी उद्योगांचा सहभाग वाढला



**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराच्या खरेदी धोरणात गेल्या पाच वर्षांत ऐतिहासिक बदल झाला असून परकीय कंपन्यांवरील अवलंबित्व ३८ टक्क्यांवरून थेट १२ टक्क्यांवर आले आहे. त्याचबरोबर लष्करी कंत्राटांमध्ये भारतीय खासगी उद्योगांचा वाटा ५ टक्क्यांवरून ३१ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. 'उसन्या' तंत्रज्ञानावर विकसित राष्ट्र बनणे शक्य नसल्याची जाणीव ठेवून लष्कर आता स्वदेशी खासगी भागीदारीवर भर देत आहे, असे प्रतिपादन उप-लष्करप्रमुख (क्षमता विकास आणि शाश्वतता) लेफ्टनंट जनरल राहुल आर. सिंह यांनी केले. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातर्फे आयोजित 'जय से विजय' (संयुक्तता, आत्मनिर्भरता आणि नवोन्मेष) या चर्चासत्रात ते बोलत होते. या वेळी त्यांनी भारतीय लष्कराच्या गेल्या पाच वर्षांतील खरेदीचा आढावा सादर केला.

# पनवेलमध्ये हर्षवर्धन सकपाळांचा निषेध

## छत्रपती शिवाजी महाराज चौकात काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानाशी केल्याच्या वक्तव्याचे पडसाद राज्यभर उमटत असून पनवेलमध्ये महायुती आणि शिवप्रेमींनी आक्रमक निषेध नोंदवला. रविवारी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि शिवप्रेमी एकत्र आले.

या वेळी उपस्थित महिलांनी हर्षवर्धन सकपाळ यांच्या छायाचित्राला जोडे मारत संताप व्यक्त केला. घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात जोरदार निषेध नोंदवला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. काँग्रेस नेत्यांकडून यापूर्वीही महाराजांचा अपमान झाल्याचा आरोप त्यांनी केला.

या निषेध आंदोलनात महापौर नितीन




पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, शहराध्यक्ष सुमित झुंजारराव यांच्यासह महायुतीचे नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि शिवप्रेमी उपस्थित होते.

### जाहीर माफी मागा -आमदार प्रशांत ठाकूर

राज्याच्या भावना, इतिहास आणि सांस्कृतिक मूल्ये समजून न घेणाऱ्या व्यक्तीची काँग्रेसने प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली, हे त्यांच्या विचारांचे दर्शन घडवणारे आहे, सतत वाद निर्माण करून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सकपाळ करत आहेत. जोपर्यंत ते जाहीर माफी मागत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहिले पाहिजे. शिवजयंती काही दिवसांवर येऊन ठेपली असताना काँग्रेस नेत्यांना कार्यक्रमात थारा देऊ नका. छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वाभिमान जागृत ठेवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

# पंतप्रधान मोदींकडून महाराष्ट्रासह चार राज्यांना रेल्वे प्रकल्पांची भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना बळकटी देणाऱ्या तीन महत्त्वाच्या बहुमार्गी प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणा आणि कर्नाटक या चार राज्यांतील १२ जिल्ह्यांमध्ये रेल्वेचे जाळे विस्तारणार असून, एकूण ३८९ किलोमीटरची भर पडणार आहे. १८,५०९ कोटी रुपये अंदाजे खर्च असलेले हे प्रकल्प २०३०-३१ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

यामध्ये महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा कसारा - मनमाड दरम्यानच्या ३ या आणि ४ थ्या रेल्वे मार्गाचा समावेश आहे. यासोबतच दिल्ली - अंबाला आणि बल्लारी - होस्पेट या मार्गांवरही ३ रा आणि ४ था मार्ग उभारला जाणार आहे.

**१८,५०९ कोटींच्या खर्चाला मंजुरी**

या प्रकल्पामुळे सुमारे ९७ लाख लोकसंख्या असलेल्या ३,९०२ गावांची संपर्क व्यवस्था सुधारणार आहे. विशेषतः महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, भावली धरण, श्री घाटणदेवी यांसारख्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांकडे जाणारा प्रवास आता अधिक सोयीचा होईल. तसेच कोळसा, पोलाद, लोह खनिज, सिमेंट आणि धान्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी हे मार्ग कळीचे ठरणार आहेत.

### नाशिक-पालघर प्रवासाला वेग!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ने महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय महामार्ग-१६० ए (NH-160A)च्या घोटी-त्र्यंबक (मोखाडा)-जव्हार-मानोर-पालघर या १५४.६३५ किमी लांबीच्या विभागाच्या पुनर्वसन आणि चौपदरीकरण सुधारणेला सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी एकूण ३,३२०.३८ कोटी रुपयांचा भांडवली खर्च अपेक्षित असून, यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीमधील कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# शिवजयंती आणि रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन १९ फेब्रुवारी रोजी उलवे नोड येथे करण्यात आले आहे. खारकोपर रेल्वे स्थानकाजवळील रामशेठ ठाकूर मैदानावर हा सोहळा उत्साहात होणार असून त्यानंतर २० ते २२ फेब्रुवारीदरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त रायगड जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर शनिवारी उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये महत्त्वपूर्ण नियोजन बैठक झाली. बैठकीस माजी खासदार



लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक व जिल्हा पंच मंडळाचे अध्यक्ष शरद कदम यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, उलवे नोड येथे उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा परिसर आणि लगतचे मैदान लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कार्याध्यक्ष म्हणून माझ्यावर सोपवण्यात आली आहे.

ही जबाबदारी यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन मोलाचे ठरणार असून आपण यामध्ये निश्चित यशस्वी होऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बैठकीत शिवजयंती उत्सव आणि कबड्डी स्पर्धांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## निवडक

### मणिपूर येथे कारवायांमध्ये १० दहशतवाद्यांना अटक

**मणिपूर :** गेल्या २४ तासांत मणिपूरच्या विविध भागात पोलिस आणि सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत दोन महिलांसह दहा दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून शस्त्रे जप्त करण्यात आली आणि जप्त केलेले आयईडी नष्ट करण्यात आले.

### केदारनाथ मंदिराचे द्वार २२ एप्रिलला उघडणार

**डेहराडून :** उत्तराखंडमधील प्रसिद्ध केदारनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी यावर्षी २२ एप्रिल रोजी उघडले जाणार आहेत. हिवाळ्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून बंद असलेले हे मंदिर पुन्हा एकदा भक्तांच्या जयघोषाने दुमदुमणार असल्याची माहिती मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

### उरणमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के

**उरण :** तालुक्यातील कोप्रोली येथे रविवारी (दि.१५) सायंकाळी १७.४७ वाजता २.४ मॅग्निट्यूड्चा भूकंपाचा धक्का बसला असून यामध्ये कोणतेही नुकसान झाले नसल्याची माहिती तहसीलदार उरण यांनी कळविली आहे.

# महाराष्ट्रात एटीएसची २१ ठिकाणी छापेमारी

**यवतमाळ, अहिल्यानगर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई केली आहे. १५ फेब्रुवारी रोजी राज्यात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम राबवली. यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात ही कारवाई करण्यात आली, जिथे एकूण २१ ठिकाणी छापे टाकण्यात आले. एटीएसच्या पथकांनी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद आणि उमराखेड शहरातील १७ ठिकाणी तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील सात ठिकाणी शोध मोहिम राबवली.

एटीएस पथकांनी संशयितांच्या घरांवर, कार्यालयांवर आणि इतर ठिकाणी धाड टाकली. सर्वांची झडती घेण्यात आली. छाप्यांमध्ये गुन्हेगारी कागदपत्रे, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज देखील तपासण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छाप्यांमध्ये दहशतवादी संघटनांशी संबंध किंवा तरुणांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांशी संबंधित साहित्य आढळले. अद्याप कोणालाही औपचारिकरित्या अटक करण्यात आलेली नसली तरी, एक डझनहून अधिक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील कट्टरतावाद आणि दहशतवादविरोधी कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. एटीएसने जिल्हा पोलिस पथकांच्या सहकार्याने काम केले आणि मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले. राज्यात अनेक तरुणांमध्ये कट्टरतावाद निर्माण होत आहे. या माहितीच्या आधारे हे छापे टाकण्यात आले. गेल्या काही महिन्यांत, महाराष्ट्र एटीएसने अल कायदा आणि इतर संघटनांशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये कारवाई केली आहे, ज्यामुळे सुरक्षा एजन्सी हाय अलर्टवर आहेत.

## भारत स्वतःच्या अटींवर करार करतो -पीएम मोदी

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि युरोपियन युनियनसोबत



झालेल्या व्यापार करारांबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची आर्थिक दिशा, सुधारणा, खासगी क्षेत्राची भूमिका, संरक्षण क्षेत्र आणि डिजिटल एआय भविष्यावर सविस्तर भाष्य केले.

वृत्तसंस्था पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी म्हणाले की, राजकीय स्थैर्यामुळे भारतात गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा वाढला आहे. मजबूत मॅन्युफॅक्चरिंग सेक्टर, सेवा क्षेत्र आणि एमएसएमई (सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग) यांच्या बळावर भारत आज ३८ देशांसोबत स्वतःच्या अटींवर व्यापार करार करण्यास सक्षम झाला आहे.

## मुलुंड मेट्रो दुर्घटना

# पाच जणांना अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुलुंड पश्चिम येथे शनिवारी दुपारी बांधकाम सुरू असलेल्या सिमेंट मेट्रोच्या खांबाचा काही भाग कोसळला. रस्त्याने जाणाऱ्या रिक्षा आणि एका कारवर हा स्लॅब पडल्याने या घटनेत तीन जण गंभीर जखमी झाले असून एकाच मृत्यू झाला आहे. या घटनेवर मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर रितू तावडे यांनी हा १०० टक्के निष्काळजीपणा आहे, दोषींवर कडक कारवाई केली जाईल अशी प्रतिकिया दिली.

अशातच आता मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणी एमएमआरडीएने मोठी कारवाई केली आहे. एमएमआरडीएने कार्यकारी अभियंत्याला निलंबित केले असून उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली आहे. त्याच बरोबर मुलुंड पोलिसांनी कंत्राटदार आणि सल्लागार कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांना अटक केली आहे. शनिवारी दुपारी मुलुंड येथील एलबीएस रोडवर मेट्रोच्या कामादरम्यान झालेल्या अपघाताप्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली आहे. या चौकशी समितीच्या अहवालानंतर दोषींविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले आहे.

मेट्रो लाईन ४ (वडाळा-कासारवडवली) मार्गावर मुलुंड येथे शनिवारी झालेल्या दुर्घटने प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकारी अभियंता सत्यजित साळवे यांना तत्काळ निलंबित करण्याचे निर्देश दिले आहेत.

## 'राहुल गांधींकडून देशाची दिशाभूल'

**नवी दिल्ली :** गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी गांधीनगर येथून राहुल गांधींवर हल्लाबोल केला. गांधीनगरमध्ये सीबीडीसी-आधारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे उद्घाटन करताना अमित शहा म्हणाले की, राहुल गांधी देशाची दिशाभूल करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युरोपियन युनियन, इंग्लंड आणि अमेरिकेसोबत केलेल्या व्यापार करारांमध्ये शेतकरी, मच्छीमार आणि पशुपालकांच्या हिताशी तडजोड केलेली नाही, असे शाह यांनी स्पष्ट केले. या करारांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल असा राहुल गांधी पसरवत असलेला मिथक पूर्णपणे खोटा आहे, असे शाह म्हणाले. काँग्रेसचे 'राजे' संसदेत मोठ्या प्रमाणात बोलतात, परंतु सत्य हे आहे की मोदी सरकारने यूपीएच्या १० वर्षांच्या तुलनेत १५ पट जास्त एमएसपीवर धान्य खरेदी केले आहे.

# महाशिवरात्रीनिमित्त घुमला बम बम भोलेचा गजर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाशिवरात्रीचा उत्सव रायगड जिल्ह्यात मोठया उत्साहात आणि भक्तीपूर्ण वातावरणात साजरा झाला. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महाशिवरात्रीनिमित्त रायगड जिल्ह्यातील सर्वच शिवालयांमध्ये बम बम भोले...हर...हर महादेवचा गजर घुमला. मोठ्या उत्साहात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून महाशिवरात्र साजरी झाली. अलिबाग शहरातील काशीविश्वेश्वर मंदिरात सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. तर कमळ नागरी पतसंस्थेच्या वतीने कार्यालयात महाशिवरात्रीचे औचित्य साधून भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात



आला होता.


जिल्ह्यातील प्रमुख मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. पहाटे काकड आरती झाल्यानंतर विधीवत पूजाअर्चा करण्यात आली. त्यानंतर मंदिरे दर्शनासाठी खुली करण्यात आली. शंकराच्या पिंडीवर वाहण्यासाठी फुले, बेलपत्र यांची विक्री मोठ्या प्रमाणात झाली. अलिबागजवळ डोंगरावर असलेल्या श्रीक्षेत्र कनकेश्वर येथे मध्यरात्रीपासूनच भाविकांनी गर्दी केली होती.

दक्षिण काशी अशी ओळख असलेले श्रीक्षेत्र हरिहरेश्वर, महाडचे ग्रामदैवत श्री विरेश्वर महाराज मंदिरात दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. कर्जत तालुक्यातील महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तालुक्यातील प्रत्येक मंदिराच्या बाहेर दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा दिसत होत्या. बहुतांश मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अलिबाग शहरातील श्री काशीविश्वेश्वर मंदिर, आंग्रेकालीन शिवमंदिर, उंच डोंगरावर असलेले श्रीक्षेत्र कनकेश्वर, रांजणखार येथील भुवनेश्वर, अलिबागनजिक गोकुळेश्वर, सिध्देश्वर, रामधरणेश्वर, चौलमधील रामेश्वर, सोमेश्वर, गोरेगांव येथील श्री मल्लिकार्जून मंदिर, पेणचे श्री पाटणेश्वर येथेही महाशिवरात्र उत्सव साजरा झाला.

# बँकॉक, सिडनीमध्ये भारताच्या रणरागिणींचा डंका

## पाकिस्तानवर आठ विकेट्स राखून दणदणीत विजय



**बँकॉक :** राइजिंग स्टार्स आशिया कप २०२६ मध्ये भारतीय महिला क्रिकेटचा ए संघ आणि पाकिस्तान महिलांचा ए संघ यांच्यात सामना खेळवला गेला. या सामन्यात पाकिस्तानने टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, मात्र टीम इंडियाने त्यांना १०० धावांच्या आतच गुंडाळलं.

एसीसीद्वारेबी आयोजित केल्या गेलेल्या वुमेंस एशिया कप राइजिंग स्टार्स २०२६ अंतर्गत ही स्पर्धा आहे. या स्पर्धे अंतर्गत भारत ए आणि पाकिस्तान ए हे दोन संघ आमने सामने येतील. हा सामना थायलंडची राजधानी बँकॉकच्या टेर्डथाई क्रिकेट ग्राउंडमध्ये खेळला गेला.

या सामन्याचा टॉस पाकिस्तानने जिंकला आणि त्यांनी प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, मात्र टीम इंडियाच्या महिला खेळाडूंनी हा निर्णय चुकीचा ठरवत पाकिस्तानच्या संघाला १८.५ ओव्हरमध्ये ९३ धावांवर ऑलआउट केले.

### फक्त ५० धावा करून ऑस्ट्रेलियाला हरवले

**सिडनी :** भारताचा महिला क्रिकेट संघ सध्या ऑस्ट्रेलीया दौऱ्यावर असून येथे ते तीन सामन्यांची टी-२० सीरीज खेळवली जात आहे. सिडनी क्रिकेट ग्राऊंडवर खेळवण्यात आलेल्या सामन्यात टी-२० सामन्यात टीम इंडियाने विजय मिळवलाय. टीम इंडियाच्या या विजयात पावसाने मोठी भूमिका निभावली. पावसामुळे हा सामना पूर्ण झाला नाही, परंतु डकवर्थ लुईस नियमांच्या अंतर्गत भारतीय संघाने विजय मिळवला. सामन्यात भारतीय गोलंदाजांनी जबरदस्त फलंदाजी केली ऑस्ट्रेलियाचा संघ एका लहान स्कोअरवर बाद झाला.

पहिल्या टी-२० सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने टॉस जिंकला आणि प्रथम फलंदाजी निवडली. भारतीय गोलंदाजांनी १८ ओव्हरमध्ये १३३ धावा करून ऑस्ट्रेलियाला ऑलआउट केलं.

## संपादकीय

# मरण झाले स्वस्त!

आत्महत्यांचा वाढता कल हा गंभीर मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रश्न आहे. मुलं, तरुण सुरक्षित आणि तंदुरुस्त जीवन जगण्यासाठी समाज, पालक तसेच शैक्षणिक संस्था सर्वांनी एकत्र काम करणे गरजेचे आहे. भावनिक आधार, संवेदनशील संवाद आणि मानसिक आरोग्याच्या उपाययोजनांचा नियमित अवलंब करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने सजग राहून पावले उचलण्याची गरज आहे...

**अलीकडे विविध भागांत आत्महत्यांच्या धक्कादायक घटनांची साखळी पहायला मिळत आहे. नवी मुंबईतील एका तरुणीने लोणावळा येथील टायगर पॉइंटजवळ उडी मारून आपले जीवन संपविले, तर काही दिवसांनी पुण्यातील आयटी कर्मचाऱ्याने लायन्स पॉइंटजवळील दरीत उडी मारली. याचप्रमाणे मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एका दिवशी सहा जणांनी गळफास घेऊन आत्महत्या केली, ज्यामध्ये दहा व पंधरा वर्षीय मुलींसह तरुणांचा समावेश होता. या घटनांचा एकत्रित विचार केल्यास एक गंभीर सामाजिक आणि मानसिक आरोग्याचा प्रश्न समोर येतो. केवळ आर्थिक किंवा वैयक्तिक अडचणी नव्हे, तर लहान-लहान कारणांवरून तरुण आणि मुलं जीवनाचा तोटका स्वीकारत असल्याचे दिसून येते. विशेषत: बुलडाणा शहरातील एका नामांकित विद्यालयात आठव्या वर्गात शिकणाऱ्या दोन मित्रांनी एकाच घरात छताला गळफास घेऊन आपले जीवन संपविले, हे प्रकरण पालकवर्ग आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी धक्कादायक ठरले आहे. चौदा वर्षांचे हे जीवन नुसतेच संपले नाही, तर समाजाच्या संवेदनशीलतेलासुद्धा प्रश्न विचारला आहे. आत्महत्येच्या या वाढत्या घटनांमागे अनेक कारणे असू शकतात ती म्हणजे मानसिक आरोग्याची दुर्लक्ष, सामाजिक दबाव, कौटुंबिक तणाव, शैक्षणिक अपेक्षा आणि भावनिक अस्थिरता, परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की अशा परिस्थितीत समाज, शाळा आणि पालक यांचा समन्वय अत्यंत गरजेचा आहे. मुलांच्या भावना आणि मानसिक स्थितीला योग्य प्रतिसाद न मिळाल्यास त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक कठीण क्षण भयंकर परिणाम करू शकतो. संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेला ही घटना जागृत करायला हवी. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी नियमित सल्लामसलत, समुपदेशन आणि मनोवैज्ञानिक मदत उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांच्या भावनिक गरजांकडे जास्त संवेदनशीलतेने लक्ष द्यायला हवे. समाजानेही या घटनांकडे दुर्लक्ष न करता खुल्या संवादाची, समजूतदारपणाची आणि आधार देण्याची संस्कृती निर्माण केली पाहिजे. शेवटी प्रत्येक आत्महत्या ही केवळ एका व्यक्तीचा त्रास नसून संपूर्ण समाजासाठी धक्का आहे. ही धक्कादायक घटना केवळ दुखःदायक नाही, तर चेतावणी आहे ती जीवनाची किमया ओळखायला आणि मानसिक आरोग्याला महत्त्व द्यायला. जर आपण या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर या प्रकारच्या घटना वाढत राहतील आणि भविष्याचा दरवाजा अधिक भयावहतेने उघडेल. समाज आणि संस्था एकत्र येऊन मुलांचे, तरुणांचे आणि प्रौढांचे मानसिक आरोग्य जपणे ही आपली जबाबदारी आहे. आपल्याला लक्षात ठेवावे लागेल की कुणीही अशा वेदनादायक परिस्थितीत एकटे नाही आणि मदतीसाठी नेहमी मार्ग उपलब्ध आहेत. तेव्हाच अशा प्रकारच्या दुर्दैवी घटनांना पायबंद बसेल.**

# उकिरड्यातूनही उगवतील उमेदीचे कोंब...

परीक्षेचे निकाल लागतात कुणाच्या डोळ्यांत आनंदाश्रू असतात, तर कुणाच्या डोळ्यांत काळजी, भीती आणि न बोलता येणारे दुःख दाटलेले असते. काही मुले-मुली गुणपत्रिका हातात धरून अभिमानाने उभी असतात; तर काहींचे हात थरथरत असतात..काही घरांत आनंद असतो; तर काही घरांत शांतता. काही विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान असते; तर काहींच्या डोळ्यांत अश्रू दाटलेले असतात. नापास हा शब्द मनावर जणू ठसठशीत उमटतो. मी काहीच नाही माझ्यात काहीच नाही अशी भावना मनाला पोखरू लागते. समाजाची कुचेष्टा, नातेवाईकांची तुलना, मित्रांची टिंगल-हे सगळे मिळून विद्यार्थ्याला जणू समाजाच्या उकिरड्यात फेकून देतात. काही जण बेशुद्धासारखे जगू लागतात; काही जण मानसिकदृष्ट्या खचतात; काही जण स्वतःपासून दूर जाऊ लागतात.

उकिरडा म्हणजे केवळ कचऱ्याचा ढिग नव्हे; तो समाजाने नाकारलेल्या, तुडवलेल्या आणि कमी लेखलेल्या अस्तित्वांचे प्रतीक. आणि अनेकदा परिस्थितीच्या ओघात माणसालाही तिथेच उभे केले जाते. कशाने होते हे ? कधी घरची आर्थिक परिस्थिती डळमळीत असते. घरातील तणाव आत्मविश्वास पोखरत असतो. घरातील व्यक्तींनी केलेल्या चुका आपल्या वाट्याला येतात. कधी जातीभेद जखमा देतात. कधी वाईट संगती आयुष्याची दिशा बदलते. कधी निरक्षर घरातील अंधश्रद्धा विचारांना कैद करते. कधी एखाद्या राजकारणी व्यक्तीच्या प्रभावाने भविष्य नासते. कधी व्यसनाची लागण होते. कधी शरीराची भूक विवेक हरवते. कधी वासनेच्या हौदात मारलेली उडी आयुष्य चिखलात ओढते. कधी मूर्ख मित्र-मैत्रिणींचे विचार भरकटवतात. कधी अनुवांशिकतेचे ओझे जाणवते. कधी धर्माचा, श्रद्धेचा अतिरेक विवेक झाकोळून टाकतो. कधी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांशी दोस्ती आयुष्य काळवंडते. कधी पहिल्या प्रेमात आटलेले अश्रू मन कोरडे करतात. कधी चिंतेचा धूर इतका दाटतो की पुढचा रस्ता दिसेनासा होतो. तर कधी निष्ठेने स्वीकारलेली मानसिक गुलामगिरी आपल्याला स्वतःपासून दूर नेत राहते.आणि मग अपयश येते. आणि वाटते-मी संपलो.पण आपण निर्जीव वस्तू नाही की गंजून जाऊ. आपण माणूस आहोत. माणसाच्या मनाला कोंब फुटू शकतात. जळालेले झाड पुन्हा पालवी धरू शकते. राखेतून हिरवा अंकुर उगवू शकतो. मनाचे विमान उकिरड्यातून आकाशात झेपावू शकते. अपयश हा शेवट नसतो; तो नव्या उमेदीची जमीन असतो.

मुलांनो आणि मुलींनो! स्वतःला एक प्रश्न विचारा-बिघडले कुठे? चिंतेने जळत बसू नका; चिंतन करा. दोष इतरांवर टाकू नका; स्वतःशी प्रामाणिक व्हा. अभ्यास अपुरा होता का? वेळेचे नियोजन चुकले का? मोबाईल, व्यसन, आळशीपणा यांनी वेळ खाल्ली का? चुकीची संगत होती का? भीतीमुळे पेपर नीट लिहिता आला नाही का? कारणांचा प्रामाणिक शोध घेतल्याशिवाय पुढचा मार्ग सापडत नाही. दुरुस्ती तुमचे मन करणार आहे; तुमची जिद्द करणार आहे. तोडणारे आणि तुडवणारे भरपूर असतील. कमी लेखणारे, टिंगल करणारे, पाय ओढणारे असतील. पण त्यांच्या शब्दांनी तुमची ओळख ठरत नाही. तुमची ओळख तुमच्या कष्टांनी ठरते. म्हणून मनाशी ठरवा-मी उगवणार आहे. मी बहरणार आहे. मी चांगले जीवन जगणार आहे. मी करपून जाणार नाही; मी फुलणार आहे आणि सुगंध देणार आहे. माझे जीवन केवळ माझ्यासाठी नाही; ते माझ्या कुटुंबासाठी, माझ्या गावासाठी, माझ्या राज्यासाठी आणि देशासाठी आहे.

योग्य मित्र निवडा. सकारात्मक संगत ठेवा. शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या. शंका विचारण्यास लाजू नका. रोज थोडे थोडे अभ्यास करा. मोठे यश एका दिवसात मिळत नाही; ते दररोजच्या छोट्या प्रयत्नांतून उभे राहते. वाचलेले लिहिता आले पाहिजे; लिहिलेले आत्मविश्वासाने बोलता आले पाहिजे. अपयश हा शिक्का नाही; तो जागे करणारा इशारा आहे. आपण नेहमीच सावध राहून पूर्ण अभ्यास करावा आणि विषय सोडवावेत, नापास कुणीही होत असते, मी पण झालो होतो, पण नापास मुले पुढे जगात खूप कर्तबगार झाली आहेत .स्वतःवर विश्वास ठेवा आणि जे येत नाही ते आले पाहिजे हा ध्यास घेऊन ते शिकून घ्या ,तसेच आपण नापास का होतो याची कारणे शोधावीत आणि ती समजली की ती दुरुस्त करण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. आपण ज्या परिस्थितीतून आलो त्याची जाणीव ठेवून आपण चांगले शिकलो,तरच आपली किंमत वाढेल असे ध्यानात घेऊन प्रामाणिक प्रयत्न करावेत, जो विषय समजत नाही ,त्यातले काय समजत नाही ते शिक्षक यांचेकडून अतिशय लक्ष देऊन समजून घेणे,शिक्षकाकडून समजून घेण्यासाठी सतत त्यांच्या सोबत चर्चा करावी।. वेळ वाया जाणार नाही, मन अस्थिर होणार नाही,आजारी पडणार नाही यासाठी देखील स्वतःचे मानसिक व शारीरिक आरोग्य नित्य चांगले ठेवा. शाळेचा, कॉलेजचा अभ्यास तर पूर्ण करायचाच पण त्या विषय संदर्भात अनेक ग्रंथ वाचून अधिक ज्ञान समृद्ध झालं पाहिजे. वाचलेले लिहिता आले पाहिजे, मनात एवढे घेतले पाहिजे की ते कधीही बोला म्हटले तर सांगता आले पाहिजे ,म्हणून मैत्रिणीशी चर्चा अभ्यास विषयक सतत केली पाहिजे. एकटे एकटे राहू नये, आपण सतत इतरांना किंमत देत शिकून घेत राहिले पाहिजे,आपण इतरांना कुणी विचारले तर त्या त्या वेळी निसंकोच सांगत राहावे त्यामुळे निर्भयपणा वाढतो, आत्मविश्वास वाढत जातो, तो आपण वाढण्यासाठी जाणीवपूर्वक काम केले पाहिजे, येणाऱ्या काळात परीक्षेत चांगली मार्क्स मिळवण्यासाठी आतापासूनच सखोल अभ्यास केला तरच चीज होईल, नुसते पास होणे महत्त्वाचे नसते ,तर आपल्याला मिळवायचे असेल तर स्पर्धेत,परीक्षेत नेहमी जिंकण्यासाठी ज्ञान आत्मसात केले पाहिजे,मुलाखती दिल्या पाहिजेत, परीक्षेत मार्क्स खूप अधिक मिळवले पाहिजेत, आम्ही सर्वोत्कृष्ट गुण मिळवण्यासाठी प्रयत्न करत असतो,हा ध्यास आणि कष्ट घेतले पाहिजे.

आपले भवितव्य आपल्याच प्रयत्नांवर अवलंबून आहे, अखंड प्रयत्न आपण केले पाहिजेत,मोठी माणसे खूप कष्ट घेतात ,ध्यास घेतात, चांगल्या इच्छा मनात ठेवतात,प्रयत्न करतात,जिंकण्यासाठी जी जी संकटे अडचणी मध्ये येतात त्यांना हरवतात ,म्हणजे त्यांचा निर्धार आणि प्रयत्न जोराचे असतात, आपण त्या प्रमाणे काम केले नाही तर ,आपण नुसते शांत बसून राहिलो तर सुख आपोआप येणार नाही.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाट्याला कितीतरी अडचणी आल्या होत्या. सातारयात शाळेत असताना त्यांना नळाचे पाणी स्वतः घेऊ दिले नाही. अस्पृश्यता एवढी पसरलेली असताना शिक्षण घेण्याची जिद्द पहा.उकिरड्यासारखे बहिष्कृत आयुष्य ज्ञानाची साधना करून जगात महान बनवले. विषमता उखडून टाकणारे आणि समता बंधुभाव निर्माण करणारे देशाचे संविधान बनवून योग्य दिशेने जाण्याचा मार्ग देशाला दिला. जगाला मार्गदर्शक ठरणारे प्रेरक विद्यार्थी बनले. शिक्षणाच्या बळावर त्यांनी इतिहास घडवला. कर्मवीर भाऊराव पाटील हे नापास झाले होते,पण त्यांनी रयत शिक्षण संस्था उभारून किती भारतीयांचे जीवन उज्वल केले. स्वावलंबी शिक्षण घ्या, स्वतः कमवा आणि शिका ,रयत सेवक व्हा असे म्हणत असत ते. जोतीराव सावित्रीआई यांनी तर किती अपमान सहन केले ,पण शिक्षण घेतल्याशिवाय तुमचे जीवन उन्नत होणार नाही हे आयुष्यभर सांगितले .नितीमत्ता चांगली ठेवा ,व्यसनी होऊ नका,कर्ज काढू नका, कष्ट अखंड करा ,सत्यशोधक व्हा ,समाजाचे कल्याण करा,लोकाना शहाणे करा .अज्ञानात राहू नका. किती कळकळीने संदेश दिला .कोणत्याही विद्यापीठात न शिकलेले संत गाडगेबाबा तर कीर्तनातून लोकांना अंधश्रद्धेतून बाहेर काढत होते. महारोग्यांची सेवा करत होते. शिक्षण घ्या,सदाचारी व्हा.संदेश देत होते. डॉ. नरेंद्र दाभोलकर युवकांना विचारी ,विवेकी होण्यासाठी झटत होते. आपला विकास आपल्या हाती ,हक्क हवेत पण कर्तव्य आधी सांगत होते. ए.पी.जे अब्दुल कलाम नावाचा एक साधा मुलगा होता. वर्तमानपत्रे घरोघरी टाकणारा एक मुलगा ,गरिबीतून संघर्ष करत पुढे आला मिसाईलमन झाला. राष्ट्रपती झाले आणि संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान ठरले

ज्याना ज्ञान मिळवायचे असते ते वेळ वाया घालवत नसतात, वेळेचा उपयोग करून ज्ञान कौशल्य, पैसा वाढवतात, आणि मग ते मोठे होऊ लागतात, मोठे होणे म्हणजे लॉटरी नाही,तर सतत ध्यास, प्रयत्न,उपयोग,कौशल्य घेऊन पैसा मिळवणे असे आहे . हे जे करतात ते हळू हळू मोठे होतात,.पी हळद अन हो गोरी ..असे घडत नसते., स्वतःवर विश्वास ठेवा ।आणि जे येत नाही ते आले पाहिजे हा ध्यास घेऊन ते शिकून घ्यावे. आपला जीव आहे. हिरवा अंकुर फुटू लागला आहे. त्याला पाणी द्या-सकारात्मक विचारांचे. खत द्या-सातत्यपूर्ण परिश्रमांचे. संरक्षण द्या. वाईट संगतीपासून दूर राहून स्वतःला दिशा द्या.स्पष्ट ध्येय ठेवा .

मला विश्वास आहे उकिरड्यातूनही उगवतील उमेदीचे कोंब. होय अगदी निश्चित .स्वतःवर विश्वास ठेवा.

**-प्रा.डॉ. सुभाष वाघमारे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.



## बदलते तंत्रज्ञान

### वायफायचा स्पीड स्लो झालाय? मिळवा फास्ट इंटरनेट

कधी कधी दिवसभर मोबाईलचे नेट अपुरे पडते. चित्रपट, वेब सीरिज, मालिका किंवा जास्त एमबीचे पीडीएफ डाउनलोड करण्यासाठी मोबाईलचे नेट अपुरेच पडते. त्यामुळे आपल्यातील बरेच जण घरी वायफाय लावून घेतात. वायफाय वेगवान आणि अधिक विश्वासार्ह सुविधा असली तरी काही वेळा अचानक लाईट जाणे, नेट न चालणे आदी अनेक समस्यांना आपल्या सगळ्यांनाच तोंड द्यावे लागते. मग यामुळे काम थांबते आणि मूडसुद्धा खराब होतो. तर या समस्या सोडविण्यासाठी,



राउटरची योग्य जागा निवडा - तुम्ही घरी किंवा ऑफिसमध्ये तुमचा राउटर कुठे ठेवता, हे महत्त्वाचे आहे. भिंतींनी झाकलेल्या जागा किंवा कोपऱ्यांमध्ये राउटर बसवणे टाळावे. तुमचा राउटर नेहमी हॉलसारख्या मोकळ्या जागेत किंवा ऑफिसच्या मध्यभागी असणाऱ्या भिंतीवर ठेवा; जेणेकरून सर्व ठिकाणी (घर किंवा ऑफिसमध्ये) सिग्नलचे वितरण योग्य प्रकारे होईल.

डिव्हायसेसची संख्या मर्यादित करा - जेव्हा तुम्ही तुमच्या वायफायशी अनेक डिव्हाइस कनेक्ट करता, तेव्हा स्वाभाविकपणे त्याचा स्पीड कमी होऊन जातो. त्यामुळे कनेक्ट केलेल्या डिव्हायसेसची संख्या कमी करणे सोईचे ठरेल. कनेक्शन मर्यादा सेट करण्यासाठी तुम्हाला राउटरची सेटिंग्ज तपासावी लागेल आणि नको असलेले डिव्हाइस किंवा कोणी वायफाय वापरत नसल्यास ते डिव्हाइस डिस्कनेक्ट करा.

राउटर रीस्टार्ट करा - जर तुम्ही राउटर दिवसभर चालू ठेवत असाल, तर ती एक मोठी समस्या आहे. त्यामुळे तुमच्या इंटरनेटचा वेग कमी होऊ शकतो. अशी समस्या जाणवल्यावर वायफाय रीस्टार्ट करा. काही मिनिटांसाठी राउटर बंद करा आणि नंतर तो पुन्हा चालू करा.

गरजेनुसार राउटर रीसेट करा - तुमचा राउटर एकापेक्षा जास्त वेळा किंवा विनाकारण रीस्टार्ट करण्यात काहीच नुकसान नाही. कारण- वायफायच्या सतत वापरामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. राउटर रिस्टोअर करण्यासाठी रिसेट बटण वापरा, जे तुमच्या राउटरच्या मागील बाजूस डीफॉल्ट सेटिंग्जमध्ये असेल.

राउटर अपग्रेड करा - हाय स्पीड कनेक्शन हाताळण्यासाठी चांगल्या क्षमतेसह नवीन मॉडेलमध्ये राउटर अपग्रेड करा.

# सेनापती तात्या टोपे



## निमित्त

१८५७च्या स्वातंत्र्यसमराच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्याचा पाया रचणारे एक लढवय्ये सरदार म्हणजे पेशव्यांचे सेनापती तात्या टोपे! आज त्यांची जयंती. त्यानिमित्ताने घेतलेला आढावा.

हिंदुस्थानातल्या राष्ट्रभक्तांनी ब्रिटिश शासकांविरुद्ध पुकारलेले १८५७चे स्वातंत्र्यसमर ही इतिहासातील एक धगधगती घटना. सैनिकांमध्ये असंतोष पसरून १८५७ची ठिणगी पडली. या लढ्याच्या पार्श्वभूमीवर सेनापती तात्या टोपे हे मराठी नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले. स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान मोठे होतेच तसेच त्यामध्ये तात्यांचे स्थानही तेवढेच मोठे होते.

१८१४मध्ये नाशिक जिल्ह्यातील येवल्यातला तात्या टोपे त्यांचा जन्म. पांडुरंग टोपे यांच्या आठ अपत्यांपैकी तात्या हे दुसरे अपत्य. त्यांचे मूळ नाव रघुनाथ. रघुनाथचे वडील पेशव्यांकडे दानाध्यक्षाचे काम पाहण्यासाठी ब्रह्मावर्तास येऊन राहिले. पर्यायाने तात्यांचे बालपण नानासाहेब पेशवे आणि राणी लक्ष्मीबाई यांच्याबरोबर गेले.

पुढे बरीच वर्षे नानांच्या दरबारात तात्या कारकुनी कामांत गुंतलेले होते. १८५७च्या समरात ग्वाल्हेरहून तात्यांनी आणलेल्या सैन्यावर मुख्य सेनापती म्हणून नानासाहेबांनी त्यांचीच निवड केली. त्या वेळी तात्यांच्या कर्तृत्वाचा कस लागला. कानपूरवर चढाई करण्यासाठी तात्या सज्ज झाले.


१८५७मधील दिल्ली, लखनऊ, जगदीशपूर व कानपूर या ठिकाणच्या उठावांचे सूत्रधार तात्या टोपेच होते. त्यांचा धाडसी स्वभाव, गनिमी काव्याचे अवगत तंत्र, स्वदेशावरची श्रद्धा आणि स्वामिनिष्ठा यांच्या बळावर त्यांच्या तलवारीला धार आली होती. कानपूर, लखनऊ, झाशी असे कूच करताना तात्यांचा पराक्रम पणाला लागला. कमकुवत सैन्य, नियोजनाची कमतरता, पैसा-रसद-तोफा या साधनांची कमतरता असताना त्यांना यशापयशाची चव चाखायला लागत होती, पण तात्यांची ध्येयासक्ती प्रचंड होती.

नानासाहेब पेशवे यांचा अज्ञातवास, ग्वाल्हेरच्या लढाईत राणी लक्ष्मीबाईंचा पराभव या पार्श्वभूमीवर एकच मराठी वाघ शत्रूला तोंड देत होता. शत्रूवर जरब बसवत, वेळोवेळी इंग्रजांच्या तावडीतून सुटून पुढचे ध्येय गाठण्याचा त्यांचा प्रयत्न इंग्रजांना मेटाकुटीला आणत होता. तात्या शत्रूपासून बचाव करताना मानसिंग या मित्राच्या आश्रयाला गेले. तात्यांच्या पराक्रमाला थिटी पाडणारी घटना घडली, तात्यांचा मागमूस काढणारी इंग्रजी फौज मानसिंगापर्यंत पोहचली. मानसिंगाची फितुरी नडली आणि तात्या इंग्रजांचे कैदी झाले.

७ एप्रिल १८५९ रोजी आरोपांना उत्तर देताना तात्यांच्या चेहेऱ्यावर भीती नव्हती, अपराधीपणा नव्हता, दुःख तर नव्हतेच, होता तो देशाभिमान अन् हौतात्म्याचे समाधान! १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धातल्या होमकुंडात तात्यांची शेवटची आहुती पडली. १८ एप्रिल १८५९ रोजी त्यांना मध्य प्रदेशातील शिवपुरी येथे फाशी देण्यात आले. या ठिकाणीच त्यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे.

**(साभार : बुकस्ट्रक)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### आवळा पाणी पिण्याचे आरोग्यावर होणारे परिणाम

सकाळी आवळा पाणी पिण्याने अनेक दीर्घकालीन आरोग्य फायदे होऊ शकतात. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सीचे भरपूर प्रमाण असल्याने रोगप्रतिकारशक्ती लक्षणीयरीत्या वाढते व शरीराला आणि आजाराबरोबर लढण्यास मदत करते.



रोज रिकाम्या पोटी आवळा पाणी पिण्याचे मुख्य आरोग्य फायदे : आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सीचे भरपूर प्रमाण असते. व्हिटॅमिन सी हे एक महत्त्वपूर्ण अँटिऑक्सिडेंट आहे, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते आणि शरीरातील मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानीचा सामना करते. रिकाम्या पोटी त्याचे सेवन केल्याने इतर खाद्यपदार्थांच्या तुलनेत थोडे चांगले शोषण होऊ शकते.

रक्तातील साखरेचे व्यवस्थापन : आवळा रक्तातील साखरेच्या पातळीवर सकारात्मक प्रभाव टाकू शकतो. रिकाम्या पोटी आवळा पाणी पिणे रक्तातील साखरेचे व्यवस्थापन करण्यासाठी फायदेशीर ठरू शकते,

त्वचेचे आरोग्य : आवळ्यातील व्हिटॅमिन सी कोलेजन उत्पादनात योगदान देते, त्वचेची लवचिकता वाढवते आणि संभाव्य सुरकुत्या कमी करते. आवळ्याचे पाणी उजळ रंगात योगदान देऊ शकते, आंबटपणा : आवळ्यातील उच्च व्हिटॅमिन सी घटक आम्लतामध्ये बदलते. रोज त्याचे सेवन करणे विशेषत: रिकाम्या पोटी, काही लोकांना छातीत जळजळ होणे, अपचन किंवा आधीपासून त्रास देणारे सिड रिफ्लक्स बिघडू शकते. आवळा पाणी पातळ करून हलक्या जेवणानंतर सेवन केल्याने हे कमी होण्यास मदत होते.

निर्जलीकरण : आवळ्यामध्ये लघवीचे प्रमाण वाढवणारा प्रभाव असतो, याचा अर्थ लघवी वाढते. अधूनमधून विषारी द्रव्ये बाहेर काढण्यासाठी हे फायदेशीर ठरू शकते, परंतु जर दररोज नियमित पाणी पिण्याचे प्रमाण संतुलित न राहिल्यास निर्जलीकरण होऊ शकते. दिवसभर भरपूर पाणी पिण्याची खात्री करा.

रक्तातील साखरेची पातळी : आवळा रक्तातील साखरेच्या पातळीचे व्यवस्थापन करण्याचे आश्वासन देते, पण जास्त प्रमाणात सेवन केल्याने काही व्यक्तींमध्ये हायपोग्लाइसेमिया (रक्तातील साखरची पातळी कमी होणे) होऊ शकते.

# महालगुर-मोरेवाडी येथे बिबट्याची गायीवर झडप

## गाय दगावल्याने वनविभागाकडून सावधतेचा इशारा





**पोलादपूर: प्रतिनिधी**

तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागातील महालगुर मोरेवाडी येथे बिबटयाने गायीवर झडप घालून गायीला भक्ष्य बनविल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली आहे. बिबटयाच्या हल्ल्यात गाय दगावल्याने वनविभागाच्या पोलादपूर येथील वनपाल बाजीराव पवार यांनी ग्रामीण भागातील जनतेला सावधतेचा इशारा दिला आहे.

महालगुर मोरेवाडी येथील शेतकरी अशोक भाऊ मोरे यांची दुभती गाय शनिवारी घरी परत आली नसल्याने रविवारी सकाळी शोध घेतला असता त्यांना जंगलातील दूर्गम भागात गायीच्या गळयावर बिबटयाच्या दाताचे व्रण आणि पोटावर नखांच्या खोल पंजाचे ओरबाडणे दिसून आले. गायीच्या शेपटीकडील भागाचे मांस बिबटयाने फस्त केल्याचे दिसल्याने बिबटयानेच शिकार केल्याची खात्री पटली. गाय दगावल्याने शेतकऱ्याचे दुधदुभत्याचे नुकसान झाले आहे. बिबटयाने गायीची शिकार केल्यामुळे महालगूर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या घटनेनंतर बिबटयाच्या बंदोबस्ताची मागणी ग्रामस्थांकडून वनविभागाकडे होत आहे. या घटनेबाबत अशोक मोरे यांनी वनविभागाला निवेदन दिल्यानंतर वनपाल बाजीराव पवार व वनरक्षक अमोल रोकडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला.

महालगूर मोरेवाडीतील शेतकऱ्याच्या गायीची बिबटयाने शिकार केल्याबाबत वनपाल बाजीराव पवार यांनी,नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन करून रात्रीच्या वेळी एकटयाने प्रवास करू नये, हातात काठी व बॅटरी घ्यावी, लहान मुलांना एकटे सोडू नये, रात्रीच्या वेळी आजूबाजूला फटाक्यांचा आवाज करावा म्हणजे बिबटयासारखे हिंस्र प्राणी गाव परिसरात थांबणार नाहीत तसेच गुरांचा वाडा व्यवस्थित बंदिस्त ठेवावा, वाडयाला कुंपण असावे, गुरे रानात मोकळी सोडू नयेत,असे आवाहन केले आहे. गेल्या महिन्यात झालेल्या वन्यजीव गणनेमध्ये बिबटयाच्या वास्तव्याची लक्षणे व चिन्हे पोलादपूर वनविभागाला दिसली नसताना कोतवाल भागात काहींना बिबटया निवडणुककाळात भरदिवसा वाहनासमोरून जाताना दिसल्याचे फोटो व्हायरल झाले

# महाड एमआयडीसीत भंगारचे गोदाम आगीमध्ये जळून खाक

**महाड : प्रतिनिधी**



महाड औद्योगिक वसाहती मधील एका भंगाराच्या गोदामाला भीषण आग लागल्याने गोदामातील साहित्य जळून खाक झाले, ही घटना गुरुवारी सायंकाळी घडली असून कोणत्याही स्वरूपाची जीवित हानी झाली नसल्याची माहिती औद्योगिक वसाहत पोलिसांनी दिली.


येथील औद्योगिक वसाहतीमध्ये ठीक ठिकाणी विनापरवाना बेकायदेशीर भंगार व्यवसाय करणारे परप्रांतीय असून हे व्यावसायिक कुठून आले याची नोंद प्रशासनाकडे नसल्याची माहिती मिळाली आहे. औद्योगिक वसाहती मधील टेमघर या गावाजवळ इंडोअमाईन कारखान्याच्या बाजूला सदर भंगार गोदाम आहे, कोणी मुन्ना नामक इसमाचे गोदाम असल्याचे समजते. गोदामा मध्ये कारखान्यात वापरण्यात येणाऱ्या कोळशाच्या रिकाम्या पिशव्या, प्लास्टिकच्या रिकाम्या पिशव्या यांचा मोठ्या प्रमाणात साठा ठेवण्यात आला आहे, या पिशव्यांनी अचानक पेट घेतल्याने ही भीषण आग लागल्याची माहिती स्थानिक ग्रामस्थांनी दिली.

या घटनेची माहिती मिळताच महाड एमआयडीसी, एमएमए, प्रिव्ही स्पेशलिटीच्या अग्निशामकदलांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला दोन तासानंतर आगीवर नियंत्रण आणण्यात यश आले.

महाड औद्योगिक वसाहतीमध्ये मागील काही दिवसांपासून आगीच्या घटना घडत आहेत. बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्या भंगार व्यवसायिकांच्या गोदामामध्ये रसायनाचे वापरलेले पिंप, प्लास्टिकच्या बॅगा, कोळशांची रिकामी पोती त्याचबरोबर अत्यंत ज्वलनशील वस्तूंचे भंगार साठवून ठेवण्यात आलेले असते, औद्योगिक वसाहतीमधील भंगार व्यवसायिकांची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच या परिसरातील भंगाराची गोदामे औद्योगिक वसाहत वाड्यावर त्यांपासून दूर हलविण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

# स्वामीसमर्थ डोंगरी भक्तांकडून महाशिवरात्री उत्साहात साजरी

**मुरुड : रामप्रहर वृत्त**




महाशिवरात्री निमित्ये मुरुड समुद्रकिनारी स्वच्छ सुंदर वातावरणात स्वामीसमर्थ मठ डोंगरी आयोजित धन धारणा शिबीर असंख्य स्वामीभक्तांनी नामस्मरणाचा लाभ घेतला .

याप्रसंगी .डोंगरी मठाच्या मठातीपाती त्रिशाताई पाटील म्हणाल्या महाशिवरात्रीनिमित्ये मुरुड समुद्रकिनारी धन धारणा शिबीर घेण्याचे हे ८ वे वर्ष आहे ,सकाळी समुद्रकिनारी थंड स्वच्छ वातावरणात स्वामींचे धन व नामस्मरण केल्याने भक्तांच्या मनाच्या व शरीराच्या व्याधीं पासून मुक्ती मिळते व मन व शरीर शुद्ध होते .आज मानवाला स्वतः कडे पाहायला वेळ नाही ,त्यामुळे प्रदूषित वातावरणात धकाधकीचे जीवन जगताना विविध व्याधींच्या पाशात मानव अडकतो .त्यावेळी मानवाला देवाची आठवण होते ,व तो भक्तीकडे वळतो परंतु शरीर सुदृढ असतानाच स्वामींचे स्मरण झाल्यास दैनंदिन कामात मानव उत्साही राहतो .मानातू राग ,अहंकार ,मत्सर काढून टाकण्यासाठी त्रिशताईंनी स्वामिभक्तना सोपा मार्ग दिला ,

महाशिवरात्री दिवशी शंकर पार्वती विवाह झाला .त्यादिवशी आपल्याला शंकर चरणी राग ,अहंकार ,मत्सर वाहून पवित्र मानाने शंकराचे पुनज करायचे आहे.सकाळी ६ वाजता मुरुड समुद्रकिनारी शिबिराला सुरवात झाली .

# महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वावर रायगड जिल्ह्यातील दक्षिण काशी हरिहरेश्वर येथे श्रद्धेचा महासागर उसळून आला आहे. पहाटेपासूनच हर हर महादेवच्या गजराने संपूर्ण तीर्थक्षेत्र दुमदुमून गेले असून, महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांनी त्रिलिंग स्वरूपातील भगवान शंकराचे दर्शन घेतले. मंदिर परिसर, समुद्रकिनारा आणि सभोवतालचा निसर्ग भक्तिरसाने भारलेला दिसून आला.

महाशिवरात्रीला हरिहरेश्वरचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शंकर, विष्णू आणि ब्रह्मा या त्रिदेवांची एकत्र उपासना येथे होते, म्हणूनच या पवित्र स्थळाला 'दक्षिण काशी' अशी ओळख प्राप्त झाली आहे. स्थानिक पुराणकथांनुसार प्राचीन काळी ब्रह्मा, विष्णू आणि महादेव यांनी येथे महायज्ञ केला होता. यज्ञात उत्पन्न झालेल्या विघ्नांचा नाश करण्यासाठी भगवान शंकर कालभैरव रूपात येथे प्रकट झाले, अशी श्रद्धा भाविकांमध्ये प्रचलित आहे. याच कारणामुळे हरिहरेश्वर आणि कालभैरव यांची संयुक्त उपासना महाशिवरात्रीला विशेष फलदायी मानली जाते.

महाशिवरात्रीच्या दिवशी मंदिरात अभिषेक, रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक, बिल्वपत्र अर्पण आणि रुद्रजप अशा विविध धार्मिक विधींनी दिवसभर भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते. शांत समुद्राच्या लाटांचा निनाद, मंत्रोच्चार आणि घंटानाद यांचा संगम भाविकांना एक वेगळीच आध्यात्मिक अनुभूती देत होता. अनेक भाविक उपवास, जागरण व महादेवाच्या नामस्मरणात मग्न झालेले दिसून आले.

हरिहरेश्वर परिसरातील ब्रह्मा पॉईंट, गौतम तीर्थ, पांडव तीर्थ, महाशिव तीर्थ, साक्षभैरव मंदिर आणि अगस्ती गुहा ही प्राचीन व ऐतिहासिक स्थळे भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली. या ठिकाणी भेट देताना इतिहास, पुराणकथा आणि अध्यात्म यांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळतो. निसर्गसौंदर्याने नटलेला हरिहरेश्वर समुद्रकिनारा आणि सभोवतालची हिरवीगार टेकडी ही महाशिवरात्रीच्या भक्तिभावाला अधिकच उंची देत होती.

महाशिवरात्रीनिमित्त मंदिर समिती, ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, वाहतूक व पार्किंगची योग्य व्यवस्था करण्यात आली होती. स्वयंसेवक सेवा कार्यात तत्पर असून भाविकांना मार्गदर्शन करत होते. सुरक्षितता आणि शिस्त राखत दर्शन प्रक्रिया सुरळीतपणे झाली.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने दक्षिण काशी हरिहरेश्वर येथे केवळ धार्मिक विधीच नव्हे, तर इतिहास, श्रद्धा आणि निसर्ग यांचा अद्वितीय संगम पाहायला मिळाला.

# तब्बल ४९ वर्षांनी अध्यापिकांनी जागवल्या आठवणी

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**



काळाच्या ओघात आयुष्याने वेगवेगळे वळण घेतले, जबाबदाऱ्या वाढल्या, संसार विस्तारला; पण मनाच्या कप्प्यात जपलेले कॉलेजचे दिवस मात्र तितकेच टवटवीत राहिले. तब्बल ४९ वर्षांनी माणगाव येथील शासकीय अध्यापिका विद्यालय, माणगाव येथील १९७५ ते १९७७ बॅच मधील विद्यार्थीनी एकत्र आल्या आणि आठवणींचा जणू दरवळलेला सागरच उसळून आला.

माणगाव येथील श्री वाकडाई मंदिर जवळील रम्य रिसॉर्टमध्ये हा स्नेहमेळावा रंगला. सौ. मंजिरी बापट आणि सौ. मंदा मेथा यांनी अथक परिश्रम घेत मैत्रिणींना एकत्र आणण्याचा ध्यास घेतला. सौ नलिनी कजबजे आणि निला दांडेकर यांनी त्यांना सहकार्य केले. पत्ते, फोन नंबर शोधून ग्रुप तयार करण्याचे जिकिरीचे काम करुणा शेठ आणि संध्या दांडेकर यांनी हाती घेतले, तर नंदकुमार मेथा यांनीही या उपक्रमात मोलाची साथ दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे हरवलेले धागे पुन्हा एकदा जुळले.

हास्य, आसवे आणि आठवणींची सरमिसळ

दिवसभर वातावरणात केवळ आनंदाची उधळण होती. विविध खेळ, गप्पागोष्टी, एकत्र फोटोसेशन, सुग्रास स्नहभोजन, मनसोक्त पोहून सर्वांनी जणू पुन्हा एकदा तरुणाई अनुभवली. व्हॅलेंटाईन डे निमित्त एकमेकींना गुलाबपुष्प देत मैत्रीचा सुगंध दरवळवला.४९ वर्षांपूर्वीचे डि.एड. कॉलेज मधील क्षण आठवताना काहींच्या डोळ्यांत नकळत पाणी दाटले. त्या वेळी आपण किती निरागस होतो ना! असा एक स्वर उमटताच सगळ्याच जणी भावुक झाल्या. आज त्या आजी झाल्या आहेत; नातवंडांच्या खोड्या सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची लकेर उमटत होती.

या सर्व अध्यापिका पुढे जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत राहिल्या. विद्यार्थ्यांना घडवताना आलेले अनुभव, शाळेतील संघर्ष, पालकांशी संवाद या सगळ्या आठवणींनी स्नेहमेळावा अधिक अर्थपूर्ण केला. ज्यांनी त्यांना शिकवले त्या प्राध्यापकांच्या आठवणी सांगताना मात्र अश्रूंना बांध फुटला. त्यांच्या संस्कारांमुळेच आपण इथपर्यंत पोहोचलो, असे म्हणताना कृतज्ञतेने डोळे भरून आले.

शेवटी एकमेकींच्या गळाभेटीत डोळे पाणावले. आता दरवर्षी भेटूया, हा निर्धार करून सर्वांनी जड अंतःकरणाने निरोप घेतला. डबडबलेल्या डोळ्यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली, पण मनात पुढील भेटीची आस जपली.

# पुरस्कारार्थी गुरु आणि सन्मानोत्सुक शिष्य अमृतयोग एकाच व्यासपीठावर

**खोपोली : प्रतिनिधी**



नालंदा ऑर्गनायजेशन महाराष्ट्र राज्य आयोजित ग्रामसमृद्धी सोहळा २०२६ हा कृषी सामाजिक, व्यापार आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्वाची कामगिरी बजावणाऱ्या विशेष व्यक्तींना त्यांच्या कामाबद्दल १४ फेब्रुवारी रोजी पुरस्कार प्रदान करण्याचा सोहळा पत्रकार भवन पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला, या कार्यक्रमात विशेष कौतुक म्हणजे एका विद्यार्थ्याला त्याच्या वर्गशिक्षकांचा सन्मान करण्याचा मान मिळाला.

डॉ. महेश निमणे हे सुखी वास्तु स्पिरिच्युअल सर्व्हिसेस आणि वास्तु सुख फाउंडेशन च्या माध्यमातून वास्तुशास्त्र, अंकाशास्त्र, रत्न, रेकी, समुपदेशन या माध्यमातून गेली अनेक वर्ष सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवित असून या उल्लेखनीय कामगिरी बद्दल या कार्यक्रमाला त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविण्यात आले होते. याच कार्यक्रम समारंभात त्यांचे १०वी इयत्तेत शिकविणारे त्यांचे वर्गाशिक्षक श्री आनंदराव गणेशकर सर यांची शिक्षकी पेशा असुनदेखील शेती क्षेत्रातील आवड आणि पीक उत्पादन याबद्दल यंदाचा कृषीरत्न पुरस्कार २०२६ हा देण्यात आला,

# गांगवली येथील श्री वैजनाथ महादेव मंदिरात महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी



**माणगाव: प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील गांगवली येथील श्री वैजनाथ महादेव मंदिर हे देवस्थान फार प्राचीन आहे. शिवभक्तांचे श्रद्धास्थान म्हणून हे मंदिर सर्वत्र ओळखले जाते. रायगड जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून भावीक दर्शनासाठी या मंदिरात येत असतात. या मंदिरात दरवर्षीप्रमाणे या वर्षीही रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली. माणगाव तालुक्यातील गांगवली येथील श्री वैजनाथ महादेव मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली. हजारोंच्या संख्येने भक्तगणांची उपस्थिती होती. सायंकाळी ६ नंतर रात्रभर भजन करण्यात आले. मंदिराचे विश्वस्त ज्ञानदेव दाखिणकर यांनी मंदिराच्या व्यवस्थापनाचे काम अगदी चोखपणे पार पाडले.


माणगावपासून ८ ते ९ किलोमीटर अंतरावर गांगवली हे ऐतिहासिक गाव असून यापूर्वी या गावाचे नाव गांगोली असे होते. याच गांगवली गावात ऐतिहासिक वैजनाथ महादेव मंदिर असून अतिशय प्राचीन काळातील हे मंदिर असून पर्यटनाच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिले आहे. मंदिराचे काम आता नव्याने देखील करण्यात आले आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे नातू छत्रपती शाहू महाराज हे स्वराज्याचे चौथे छत्रपती. या शाहू महाराजांचा जन्म रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील याच गांगवली गावात इसवी सन १६८२ मध्ये झाला.

या गावात पूर्वंपार तोंडलेकरवाडी ,मोकाशीवाडी, कुंभारवाडी,खरबाचीवाडी अशा अनेक वाड्या आहेत. या गावातून वैचरणा नदी वाहते. नदीकाठी वैजनाथ महादेवाचे मंदिर आहे. याच मंदिराशेजारी महाराणी येसूबाईंच्या मातुल्य आजोबांचा वाडा आहे.त्याचे अवशेष आजही तेथे पाहावयास मिळतात महाराणी येसूबाई रायगडावरून बाळंतपणासाठी गांगोली या वाड्यात आल्या होत्या त्यावेळी तेथे शाहू महाराजांचा जन्म झाला कालांतराने शाहू महाराज छत्रपती झाल्यानंतर या वैजनाथ मंदिरात येथील कुंभार बांधव( दाखिणकर ) दिवाबत्तीची नियमित व्यवस्था करीत असतात.

महाशिवरात्रीला प्राचीन काळातील या मंदिरात दिवसभर भक्तगणांची दर्शनासाठी गर्दी असते.

# तुपगाव येथे महाशिवरात्री निमित्ताने यात्रा





**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तुपगाव येथील धानेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्ताने मोठा धार्मिक सोहळा संपन्न झाला. या निमित्ताने मोठी यात्रा भरली होती, लहान मुलांनी त्याचा मोठा आनंद लूटला.

तुपगाव येथे तळ्याकाठी ऐतिहासिक मोठे शिवमंदिर आहे. सन १९६४ मध्ये या मंदिराची बांधणी झाल्याचे येथील शिलालेख वरून समजते.हे शिवलिंग हे स्वयंभू आहे,

एका शेतकऱ्याला त्याच्या भात मळणी करताना भाताच्या राशीत मिळाल्याने धानेश्वर नावाने या शिवलिंगाला ओळखले जाते. येथे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यासह नवी मुंबई,ठाणे,मुंबई, पुणे येथून भाविक येत असतात.

महाशिवरात्री निमित्ताने मोठी यात्रा भरली जाते,यात पाळणा,झुक झुक गाडी यासारखे खेळ असतात, तर लहान मुलांची खेळणी,कपडे, खजूर याचा बाजार भरतो.

तुपगाव येथे मडकी, मातीच्या चुली बनविल्या जातात, येथील मडकी थंड पाण्यासाठी प्रसिद्ध असल्याने त्याची विक्री होत असताना,मातीची खेळणी, भांडी ही विक्रीला येतात.

तुपगाव आणि परिसरात वालाची शेती मोठ्या प्रमाणात होते.येथील वाल रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत,त्यामुळे वालाच्या शेंगा आणि कलिंगड याचीही विक्री मोठ्या प्रमाणात होते.

हजारो भाविक दर्शन घेतात. तुपगाव ग्राम पंचायत सरपंच रवींद्र कुंभार व ग्राम पंचायत अधिकारी विश्वास वारे यांनी देवस्थान आणि यात्रेचे सुंदर नियोजन केले होते.

सपोनी. संतोष आवटी यांनी आज यात्रेतील पोलीस बंदोबस्त,नियोजन याची पाहणी करून सूचना केल्या. ग्राम पंचायत तुपगाव यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती.

# जुगार, सट्टाबाजांवर धडक कारवाई

## अवैध गेमींग अॅपवरून फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

भारतात प्रतिबंधित असलेल्या अवैधरित्या गेमींग अॅप, साईट उपलब्ध करून शासनाची फसवणूक केल्याबद्दल चार जणांविरोधात मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा यांनी कारवाई करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात मोबाईल फोन, लॅपटॉप व इतर ऐवज हस्तगत केला आहे.

भारतात प्रतिबंधित असलेल्या अवैधरित्या गेमींग अॅप, साईट उपलब्ध करून देवून आपसात संगनमत करून लोकांचा विश्वास संपादन करून उघडलेली बँक खाती, पासबुक, मोबाईल नंबर आदींच्याद्वारे विविध क्रिडा प्रकार हे ऑनलाईन सुविधा पुरवून भारतामध्ये प्रतिबंधित असलेल्या जुगार व सट्टाबाजी खेळण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करून त्याची साईट चालवून शासनाची फसवणूक करण्यात आली होती.

पनवेल परिसरातील मॅरेथॉन नेक्झॉन अँटीलिया, बी दुसरा माळा, रुम नं.२०३ पळस्पे येथे बेकायदेशीररित्या महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४/५ तसेच प्रमोशन अॅण्ड रेग्युलेशन ऑनलाईन गेमिंग अॅक्ट २०२५ प्रमाणे आरोपी गौतमकुमार मनवानी (वय २६), भुषण मरावी (वय २५), राजसिंग चौहाण (वय २१) व अलोकप्रसादक माझी (वय २०) हे त्या ठिकाणी वास्तव्य करून भारतात प्रतिबंधित असलेल्या अवैधरित्या गेमींग अॅप, साईट उपलब्ध करून देवून आपसात संगनमत करून लोकांचा विश्वास संपादन करत होते.

उघडलेली बँक खाती, पासबुक, मोबाईल नंबर आदींच्याद्वारे विविध क्रिडा प्रकार हे ऑनलाईन सुविधा पुरवून भारतामध्ये प्रतिबंधित असलेल्या जुगार व सट्टाबाजी खेळण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करून त्याची साईट चालवून शासनाची फसवणूक करत असल्याची माहिती मिळताच मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेने सदर ठिकाणी छापा टाकून या चौघांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात विविध बँक खाती, मोबाईल फोन, लॅपटॉप व इतर महत्वाची कागदपत्रे हस्तगत केली आहेत.

# सहा लिपिक सेवेतून बडतर्फ

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेत पूर्वाश्रमीच्या ग्रापंचायतीमधील ३२४ कर्मचार्यांचा तीन वर्षापूर्वी महापालिकेत समावेश करण्यात आला होता. या वेळी कर्मचाऱ्यांना तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. याबाबत वारंवार सांगूनही सहा लिपिकांनी तांत्रिक बाबींची पूर्तता न केल्याने महापालिकेच्या आस्थापना विभागामार्फत या लिपिकांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

महापालिकेत समाविष्ट ग्रामपंचायत कर्मचार्यांना पूर्णवेळ भरतीसाठी लढा द्यावा लागला होता. स्थानिक पातळीपासून मंत्रालयापर्यंत हे कर्मचारी लढले, मात्र सहा कर्मचार्यांना किरकोळ बाबींची पूर्तता करता आली नाही. इंग्रजी, मराठी टायपिंग, एमएससीआयटी प्रमाणपत्र हे कर्मचारी सादर करू न शकल्याने आज घरी बसण्याची वेळ आली आहे. वारंवार सांगून, पत्रव्यवहार करूनही या कर्मचार्यांनी तांत्रिक बाबींची पूर्तता न केल्याने ही कारवाई करण्यात आल्याची माहिती उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली.

सुरेश चंदन, दर्शना म्हात्रे, शिवाजी चिपलेकर, योगेश केणी, आकाश पाटील आणि अक्षय म्हात्रे अशी सहा लिपिकांची नावे आहेत. बडतर्फ केलेल्या सहा कर्मचार्यांना शेवटचा पर्याय न्यायालय उरला आहे. न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार या कर्मचार्यांना आहे. न्यायालयामार्फत मुदतवाढ घेऊन या लिपिकांना तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागणार आहे. त्यानंतर त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेतले जाईल.

# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात बक्षीस वितरण



**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती.भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त वर्षभरात अनेक आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संस्थेच्या अनेक शाळांनी सहभाग नोंदवला. वर्षभरात झालेल्या वेगवेगळ्या स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ शनिवारी (दि.१४) श्रीमती. भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला.

विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन तसेच गणित विषयातील वेगवेगळे उपक्रम या संदर्भात देखील बक्षीस वितरण करण्यात आले. यामध्ये उरण विभागातील अनेक शाळांनी सहभाग नोंदवत बक्षिसे पटकावली. लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांचा ७५व्या वाढदिवसाचे औचित्य साधत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुंदर अशी नाटिका सादर करत साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब म्हणजे ज्ञान प्रसारक, थोर समाजसेवक ज्ञानाचा महामेरू, अश्या शब्दांमध्ये विध्यार्थ्यांनी साहेबांना आपल्या भाषणांमधून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. श्रीमती. भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देखील अनेक स्पर्धांमध्ये बक्षीसे संपादन करत विद्यालयाचे नाव उंचावले.

या वेळी स्कूल कमिटी मेंबर अॅड. राहुल घरत, सुनील पाटील, सुरेश पाटील आदी उपस्थित होते. रामशेठ ठाकूर साहेबांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित आंतर शालेय स्पर्धांचे कौतुक करत विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच सहभागी सर्व विद्यालयांचे आभार व्यक्त केले.



**उरण : तालुक्यातील चिरनेर येथील ज्येष्ठ पत्रकार कै. धनंजय चिंतामण गोंधळी यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्रद्धांजली वाहिली.**



**पनवेल : जिल्हा परिषद सदस्य हर्षदा घरत व भाजप नेते अतुल घरत यांच्या वतीने कोन येथे महाशिवरात्री उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे व्यवस्थापक कोन ग्रामस्थ मंडळ होते.**

# रसायनीहून सकाळची एनएमएमटी बस सुरू करण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सध्या एनएमएमटी बससेवेच्या अनियमिततेमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सकाळच्या वेळेत येणाऱ्या बसेस विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या बससेवा अचानक बंद करण्यात आल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

रसायनी परिसरातील अनेक विद्यार्थी दररोज महाविद्यालयात जाण्यासाठी एनएमएमटी बससेवेचा वापर करतात. सकाळच्यावेळेत येणाऱ्या बसेस त्यांना महाविद्यालयात वेळेवर पोहचण्यासाठी सोयीची होत्या, मात्र या बसेस अचानक बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. सध्या सकाळी ७:४५ वाजता पहिली बस येते आणि त्यानंतर थेट ९:१५ वाजता पुढील बस उपलब्ध होते. यामुळे विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. सकाळी ७:४५ ची बस विद्यार्थ्यांसाठी खूप लवकर होते, ज्यामुळे अनेकांना ती पकडणे शक्य होत नाही. तर ९:१५ ची बस उशिरा येत असल्यामुळे विद्यार्थी महाविद्यालयात वेळेवर पोहचू शकत नाहीत. परिणामी, त्यांची महत्त्वाची लेक्चर्स बुडत आहेत.

एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याने या समस्येबद्दल बोलताना सांगितले की, ही केवळ माझी एकट्याची समस्या नसून, रसायनी परिसरातील अनेक विद्यार्थी आणि इतर प्रवाशांना याचा फटका बसत आहे. सकाळी ८:१५ ची बस बंद झाल्यामुळे आमची खूप गैरसोय झाली आहे आणि याचा आमच्या अभ्यासावर परिणाम होत आहे.

या गंभीर समस्येकडे एनएमएमटी प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सकाळी ८:१५ वाजताची बससेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी रसायनी परिसरातील विद्यार्थी आणि पालकांनी केली आहे.

## निवडक

### स्कुटीच्या डिक्कीतील पैसे चोरले

**पनवेल :** स्कुटीची डिक्की अज्ञात चोरट्याने उघडून त्यामध्ये असलेले दोन लाख १५ हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना पनवेल शहरातील टपाल नाका कानिफनाथ मंदिरासमोर घडली आहे. गणेश पाटील यांनी त्यांची बर्गमॅन स्कुटी ही उभी ठेवली असता अनोळखी चोरट्याने स्कुटीची डिक्की उघडून त्यामध्ये असलेली दोन लाख १५ हजाराची रक्कम चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### टेम्पोच्या धडकेने महिला जखमी

**पनवेल** : भरधाव टेम्पोच्या धडकेने एक महिला जखमी झाल्याची घटना पनवेल जवळील तुरमाळा फाटा परिसरात घडली आहे. भरधाव वेगाने जाणारा टाटा पिकअप टेम्पो (एमएच-४६-सीएल-८३४७) वरील चालक रमेश यादव याने त्याच्याा ताब्यातील टेम्पो हयगयीने व अविचाराने चालवून रस्ता ओलांडीत असणाऱ्या ताराबाई घरत (वय ७०) यांना धडक दिल्याने झालेल्या अपघातात त्या जखमी झाल्या आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सुपर-स्पेशालिटी डॉक्टरांची सेवा सुरू

**उरण :** परिसरातील नागरिकांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबई यांच्या वतीने सुपर-स्पेशालिटी डॉक्टरांची सेवा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मुंबईकडे जाण्याची गरज कमी होणार आहे. या अंतर्गत नेफ्रॉलॉजी तज्ज्ञ डॉ. अमर कुलकर्णी दर महिन्याच्या पहिल्या व तिसर्या शनिवारी, तर ऑर्थोपेडिक्स तज्ज्ञ डॉ. श्रवण कुमार पवार दर महिन्याच्या सोमवारी उपलब्ध राहणार आहेत. ही ओपीडी सेवा पालवी हॉस्पिटल येथे दुपारी १२ ते २ या वेळेत उपलब्ध असून, पूर्वनोंदणीसाठी ८६५५८४५८६६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उरणमध्ये महादेवाचा जयघोष

**उरण : वार्ताहर**

महाशिवरात्रीनिमित्त उरण तालुक्यात सर्व महादेवाच्या मंदिरात बम..बम..भोले सूर ऐकायला मिळाला. उरण तालुक्यात घारापुरी बेटावर असलेल्या शिव लिंगाच्या दर्शनासाठी मोरा बंदरातून बोटीने घारापुरी येथे जावून भाक्तांनी दर्शन घेतले.

जेएनपीटीजवळील असलेले शेवा शंकर मंदिर येथे भजन ठेवण्यात आले होते. सर्व भक्तांना खिचडी ठेवण्यात आली होती, असे मंदिराचे पुजारी संतोष दर्णे यांनी सांगितले.



उरण शहर सह ग्रामीण भागात महादेवाच्या दर्शनासाठी भक्तांनी रांगा लावून दर्शन घेतले. उरण शहरातील देऊळवाडी येथील संगमेश्वर मंदिर, केगाव येथील समुद किनारी असलेले माणकेश्वर शिव मंदीर, बोरी गावातील होणेश्वर मंदिर व उरण रेल्वे जवळील निलकंठेश्वर मंदिर त्याचप्रमाणे उरण तालुक्यातील सोनारी, खोपटा, जासई, चिर्ले, आवरे, पिरकोन, कळंबुसरे, शेवा, दिघोडे आदी ठिकाणी महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात आला. गावोगावी शिव मंदिरात भाविकांनी शिव लिंगाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. उरण तालुक्यातील शिव मंदिरात हर-हर महादेवाचा गजर दुमदुमला होता.

महाशिवरात्रीनिमित्त मंदिर परिसरात यात्रेचे स्वरूप आले होते. कळंबूसरे येथे यावर्षी महाशिवरात्री उत्साहाचा शतक महोत्सव साजरा करण्यात आला.

# पोलीस पाटील कुणाल लोंढे यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य तसेच पालघर जिल्हा कार्यकारिणी नियुक्ती सनद बहाल कार्यक्रम आयोजन करण्यात आले. यावेळी कुणाल अशोक लोंढे यांना महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या सह सचिव पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी बाळासाहेब शिंदे पाटील (राज्याध्यक्ष- महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ), निळकंठ थोरात पाटील (खजिनदार- महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ), विजय भुजंग पाटील (कार्याध्यक्ष- महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ.) विकास पाटील (जिल्हाध्यक्ष - रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ) मिलिंद पोपेटा (माजी अध्यक्ष - पनवेल तालुका पो. पा.संघ) प्रमोद नाईक पाटील (अध्यक्ष - पनवेल तालुका पो.पा. संघ) संतोष गायकर पाटील (अध्यक्ष - नवीमुंबई पो.पा.संघ) विजय खुटले -पाटील कार्यकारणी सदस्य - रायगड जिल्हा पो.पा.संघ) राजेश पाटील (सदस्य -अलिबाग तालुका पो. पा. संघ) आदी उपस्थित होते.



# महापौर नितीन पाटील यांचा कासारभट ग्रामस्थांकडून सत्कार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मनपा महापौर नितीन पाटील यांच्या मूळगावी कासारभट येथे श्री महाशिवरात्र उत्सवानिमित्त श्री प्रसादेश्वर मंदिर येथे भाविकांसह दर्शन घेण्यात आले. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर भगवान शंकराचे विधिवत पूजन करून ग्रामस्थांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर गावातील ग्रामस्थांच्या वतीने माझी पनवेल महानगरपालिका च्या महापौरपदी निवड झाल्याबद्दल नितीन पाटील यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

ग्रामस्थांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व्यक्त केला. या वेळी गावातील ज्येष्ठ मंडळी, महिला वर्ग, युवक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नितीन पाटील यांनी या सत्काराबद्दल सर्व ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानले. हा कार्यक्रम अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# फुंडे विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत एस. एस. सी परीक्षा २०२६ साठी प्रविष्ठ झालेल्या इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा विद्यालयाचे चेअरमन मा. कृष्णाजी कडू यांच्या अध्यक्षतेखाली व विद्यालयाचे प्राचार्य बी. बी.साळुंखे -महाराष्ट्र राज्य आदर्श पुरस्काराने सन्मानीत यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.



कार्यक्रमाची सुरवात विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन. पाटील व ९ वी च्या विद्यार्थ्यांनींनी रयत गीताचे सुमधूर आवाजात सादरीकरण केले. संगीत साथ उपशिक्षक पी. ए. पाटील यांनी दिली. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका एस.एम. बाबर यांनी प्रास्ताविकेतून विद्यालयातील विविध उपक्रमांची व वैशिष्ट्ये पूर्ण बाबींची माहिती दिली. त्यानंतर इयत्ता नववी मधील गौरी बुरुंगे, श्रुती खोडवे, तसेच इयत्ता १० वीमधील शौर्य पाटील, अथर्व कोळी, प्रीती भारती यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी व्यक्त करत शिक्षका प्रती कृतज्ञता व्यक्त केली.

विद्यालयाचे उपशिक्षक आर. जी. शेळके, जे.सी.भोपी,अॅड.मच्छीद्र घरत, अॅड. भार्गव पाटील, यशवंत ठाकूर, विश्वास तांडेल, दिपक ठाकूर प्रा. बाबुलाल पाटोळे, विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे तसेच कृष्णाजी कडू यांनी विद्यार्थ्यांना आगामी बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा देत आत्मविश्वास, सातत्यपूर्ण अभ्यास व वेळेचे योग्य नियोजन यांचे महत्व पटवून दिले.

या वेळी इयता १०वी च्या विदयार्थ्यांनी विद्यालयास दहा हजार रुपयाची साऊंड सिस्टीम भेट दिली. कार्यक्रमास उपप्राचार्या एस.डी. थोरात,पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, परेश पाटील, कार्यालय प्रमुख नितीन म्हात्रे, लेखनिक नवनीत ठाकूर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रेया पाटील, व आभार उपशिक्षक एस. डी. म्हात्रे यांनी मानले.





## हर हर महादेव!

**नवीन पनवेल : विरशैव लिंगायत समाज मंडळ, पनवेल (संचालित) सेक्टर ५ ए येथील श्री नागेशशिवलिंगेश्वर मंदिरात रविवारी महाशिवरात्रीनिमित्त सकाळपासुन दर्शनासाठी भक्तांची गर्दी झाली होती. महिला मंडळातर्फे भजन आयोजीत केले होते. संस्थेच्या वतीने भक्तांना प्रसाद म्हणुन साबुदाणा खिचडी, शिवसेना (शिंदे) तालुका प्रमुखांनी वेफर्स, खजुर आणि केळ्याचे वाटप केले. या कार्यक्रमाचे संचालन शिक्षक निळकंठ भुरे यांनी केले.**

# भारताला विकसित करताना प्रत्येकाला योगदान देण्याची आवश्यकता आहे -कपिल पाटील

**कर्जत : प्रतिनिधी**




'स्प्रिंग फाएस्टा म्हणजे आज तुमच्या कष्टाचा आणि मैत्रीचा दिवस आहे. मी सुद्धा विद्यार्थी प्रतिनिधी होतो. त्यावेळी माझे नाव न घेतल्याने मी त्यावेळचे वार्षिक स्नेहसंमेलन रद्द केले होते, मात्र त्यानंतर मी पंचायत समिती सभापती होतो. त्यावेळी त्याच विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उदघाट्नाला माला आमंत्रित केले. म्हणजे मीच बंद केलेले स्नेहसंमेलन मलाच सुरु करावे लागले. आता तुमच्यापैकी काही विद्यार्थ्यांनी शंभर पेक्षा शंभर गुण मिळविले आहेत. आम्हाला शंभरला तीन ने भागले तर जितके गुण असतात. तितके आम्हाला मिळायचे मग त्यात ग्रेस मार्क टाकून आम्ही पास होत आलो. तरी आम्ही हत्ती वरून साखर वाटायचो. तुम्ही मिळविलेले गुण उल्लेखनीय आहेत. विद्यार्थी मित्रांनो आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवला तर आयुष्यात कधीही अपयश येणार नाही. भारताला विकसित करताना प्रत्येकाला योगदान देण्याची आवश्यकता आहे.' असे महत्वपूर्ण प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी केले.

कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयात 'स्प्रिंग फाएस्टा' वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस चाललेल्या या स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण समारंभचे आयोजन करण्यात आले होते. कपिल पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष प्रकाश मुथा, सचिव प्रदीपचंद्र श्रुंगारपुरे, खजिनदार झुलकरनैना डाभीया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान, डॉ. मोहन काळे, डॉ. रामचंद्र गायकवाड, उपप्रचार्य राजकुमार नारखेडे, राम माळी आदींसह विद्यार्थी प्रतिनिधी हर्षद हडप, कशिश भगत, अनुष सुर्वे, युक्ता चौधरी, साक्षी राऊत उपस्थित होते. डॉ. पिल्लेवान यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात महाविद्यालयाचा चढता आलेख सादर केला.

कपिल पाटील पुढे म्हणाले, 'रूळलेल्या वाटांवर कुणीही चालतो परंतु स्वतःची वेगळी वाट करतो तो खरा विजेता ठरतो. तुम्ही त्यातील मुले आहात. भविष्यात आपल्याला आपल्या क्षेत्रात उंची गाठायची असेल तर कोणत्या तरी रस्त्याने चालावे लागेल. तो चांगला असेल तर प्रश्न नाही. परंतु तुमचे ध्येय चांगले असेल तर तुम्हाला रस्ता कुठे जातो हे विचारायची गरज नाही. आपोआपच तुमचे ध्येय गाठू शकाल. तुम्ही देशाचे भावितव्य घडवणारी मुले आहात. तुम्ही यापुढे असे काम करा. तुम्हाला विचारल्यावर तुम्ही जेंव्हा आम्ही कोकण ज्ञानपीठचे विद्यार्थी आहात. असे सांगाल त्यावेळी आम्हालाही समाधान वाटेल. त्यामुळे आम्हालाही तुमच्याकडून अपेक्षा आहात. जगाच्या पाठीवर एकही असा संगणक नाह की धान्याचा एक दाणाही तयार करता येईल. एका दाण्याचे हजार दाणे करता येतील. शेवटी संगणक माणूसच चालवतो. हे लक्षात ठेवा. आपण आता येथे कनिष्ठ महाविद्यालय, तंत्रनिकेतन तसेच डिम युनिव्हर्सिटी आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी सर्वांची साथ लागणार आहे.' त्यांनी मायकल जोर्डनच्या यशाचे उदाहरणही दिले. याप्रसंगी प्रा. संजय पाटील, डॉ. दीपाली केसकर, डॉ. अनंत नागपुरे, प्रा. गिरीश दाखवे, आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

# भाजपतर्फे विद्यार्थ्यांना साहित्यवाटप

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यात सामाजिक बांधिलकी जपत भारतीय जनता पक्षाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. रोहा शहर युवा मोर्चा शहराध्यक्ष अनिल घरजाळे सर यांच्या वाढदिवसानिमित्त धाटाव येथील परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला.

या वेळी दहावी बोर्ड परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या आगामी परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच शाळेत आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचा अमित घाग यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले.

कार्यक्रमाला दक्षिण रायगड युवा मोर्चा सरचिटणीस तथा नगरसेवक रोशन चाफेकर, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अनिल घरजाळे, युवा मोर्चा सरचिटणीस वैभव कुलकर्णी यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच शाळेचे चव्हाण सर ,क्रिडा शिक्षक कान्हेकर सर , वारगुडे सर, आव्हाड मॅडम ,ठमके मॅडम, कविता मॅडम ,पिगळे सर तसेच शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अमित घाग म्हणाले की, दहावीचा टप्पा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून या काळात एकाग्रतेने अभ्यास करणे गरजेचे आहे. शिक्षकांनी शिकवलेले धडे नियमितपणे अभ्यासून सराव पत्रिका सोडवाव्यात, उर्वरित दिवसांचा योग्य उपयोग करून उत्तम गुणांनी यश संपादन करावे. आई-वडिलांसह शाळा व गावाचे नाव उज्वल करणारे निकाल मिळवावेत, असे आवाहन त्यांनी केले.

आजचे युग स्पर्धात्मक असून मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शन यामुळेच यश मिळते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्याचा सल्ला दिला. तसेच या विद्यालयातून अनेक गुणवंत विद्यार्थी घडले असून समाजसेवेची परंपरा पुढे चालविण्याची अपेक्षा व्यक्त केली. भविष्यात शाळेला आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन देत, दहावीनंतर विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण आल्यास भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून मदत करण्यात येईल, असा शब्दही दिला.

# श्रीवर्धन तालुक्यात वाढत्या उष्णतेमुळे आंबा मोहोर गळती वाढली; हवामानाचा फटका

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**



श्रीवर्धन तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात अचानक बदल झाल्यामुळे बागायतदार चिंतेत सापडले आहेत. थंडी पूर्णपणे कमी झाली असून दिवसा उन्हाचा कडाका वाढू लागला आहे. वाढत्या उष्णतेमुळे आंबा बागांमध्ये मोहर करपण्यास सुरुवात झाली असून कणी ते वाटाणा आकारातील फळे मोठ्या प्रमाणात गळून पडू लागली आहेत.

यावर्षी डिसेंबर महिन्यात योग्य प्रमाणात थंडी पडल्याने आंबा झाडांना चांगला मोहर आला होता. त्यामुळे बागायतदारांना समाधानकारक उत्पादनाची अपेक्षा होती. मात्र जानेवारी अखेरपासून हवामानातील बदलामुळे परागीकरणावर परिणाम झाला असून त्यातच काही भागात पुनर्मोहर दिसून आला आहे आधी आलेली फळधारणादेखील कमी झाली आहे.

सध्या अचानक वाढलेल्या तापमानामुळे झाडांवरील शिल्लक मोहर काळवंडत असून लहान फळे पिवळी पडून गळत आहेत. यामुळे उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच थ्रीप्स व तुडतुडा यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकऱ्यांना महागड्या औषध फवारण्या कराव्या लागत आहेत. मात्र त्यावर पूर्ण नियंत्रण मिळत नसल्याचे बागायतदार सांगत आहेत.

श्रीवर्धन तालुक्यात आंबा पिकाचे उत्पादनक्षम क्षेत्रफळ १,९१० हेक्टर इतके आहे. या मध्ये ९० टक्के हापूस तर त्या खालोखाल पायरी व केसर आंब्याची लागवड बागायतदारांनी केली आहे. डोंगरउताराच्या तसेच वरकस जमीन आंबा पिकासाठी योग्य आहेत. पोषक हवामान व झाडांची निगा यावर मोहोर अवलंबून असतोया पार्श्वभूमीवर कृषी विभागाने नुकसानीचे पंचनामे करावेत.

# माणगाव महारक्तदान शिबिरात १७७ रक्तबॅग संकलित

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था. माणगाव या संस्थेच्यावतीने सलग १० व्या वर्षी के.ई.एम रुग्णालय परेल मुंबई यांच्या सौजन्याने व विशेष सहकार्याने शिवजयंती निमित्त शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी रोजी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या महारक्तदान शिबिरात १७७ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या .

सदर उपक्रमास माणगावकरांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. विशेष करून विद्यार्थिनी व महिला यांनीही या उपक्रमात सहभाग घेऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. संस्थेच्या या सेवाभावी उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. या रक्तदान शिबिराचे उदघाटन संस्थेचे उपाध्यक्ष तथा विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे व संस्थेच्या सल्लागार विवा कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे यांच्याहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे व रक्तदात्यांचे तसेच देणगीदार, हितचिंतक यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सलीम शेख, रक्तदान शिबिर समिती अध्यक्ष जेष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे व सर्व सहकारी पदाधिकारी व सभासद यांनी स्वागत करून सर्वांचे विशेष आभार व्यक्त केले.

सदर शिबिराच्या या सेवाभावी उपक्रमास माणगाव सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, केईएम रुग्णालयाचे समाज विकास अधिकारी डॉ. प्रकाश सावंत, माजी नगराध्यक्ष आनंदशेठ यादव, उपनगराध्यक्षा रिया उभारे, माजी पंचायत समिती सदस्य अलिबाग रचना थोरे, माणगाव मेडिकोजचे अध्यक्ष डॉ.परेश उभारे,संस्थेचे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पवार, उद्योजक विजयशेठ मेथा, संस्थेचे सल्लागार अकबर परदेशी, सिराज परदेशी, माणगांव पंचायत समिती सदस्य संगीता बक्कम, सामाजिक कार्यकर्ते दिपक मोरे, माणगाव वकील संघटना अध्यक्ष अँड.मोहन मेथा, जेष्ठ विधिज्ञ अँड. विनोद घायाळ, अँड.पुंडलिक मालोरे, अॅड.विलास गोठळ, माजी उपनराध्यक्ष राजेश मेहता, नगरसेवक प्रशांत साबळे, दिनेश रातवडकर,अजित तारळेकर, माजी नगरसेवक जयंत बोडेरे, भेट देऊन संस्थेचे कौतुक केले.





# माळरानावर लागलेल्या वणव्यामुळे वनसंपदा धोक्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



जमिनीचा ओलावा जसा जसा कमी होतो तसे ओले गवत सुखत जाते.सध्या तालुक्यात जिकडे - तिकडे वणवा लागत असल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येत चालला आहे.मात्र हे विझविण्याचे कष्ट अल्पच जण घेत असल्याचे पहावयास मिळत आहे.मात्र या वनव्या मध्ये गुरांच्या खाद्य समवेत,जंगली औषधी वनस्पती, वन्यजीव आदी जळून नष्ट होतात.

ग्रामीण भागात आयुर्वेदिक जंगली झाडापाल्यांना खूप महत्व असून आजही यांचा वापर करीत असतात.त्याच बरोबर पावसाळ्यातील हिरवे गवत एकत्र करून पक्षी घरटी बांधत असतात.त्यामध्ये पक्षांची अंडी सुद्धा असतात.मात्र या वनव्यामुळे ती जळून खाक होत असल्यामुळे पक्षांची प्रजनन क्षमता कुठेतरी कमी होत आहे.

जंगले ही आपली खरी संपत्ती मानली जाते.कारण या ठिकाणी वृक्ष असतात ,काही वृक्षांना फळे.फुले येत असतात.मात्र या आगीच्या प्रकोपाने यावरती विपरीत परिणाम होत असतो.झाड लागवडी पासून मोठे होण्यापर्यंत खूप वेळ जात असतो.

# ग्रामदैवत श्री वाकडाई देवीच्या पालखी सोहळा

## परंपरेप्रमाणे देवीच्या पालखीस पोलिसांची मानवंदना

**माणगांव: बातमीदार**



समस्त माणगांवचे श्रद्धास्थान ग्रामदैवत श्री आई वाकडाई देवी मंदिर जिर्णोध्दाराचे तिसरे पर्व वर्धापन दिनानिमित्ताने शनिवार दि.१४ फेब्रु. २०२६ रोजी उतेखोलगांव व उतेखोल वाडी ग्रामस्थांचा श्री वाकडाई देवीचा भव्य पालखी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. सकाळ पासूनच मंदिरात देवीचे दर्शनास गर्दी झाली. सोहळ्यात भक्तिभावे सहभागी होत समस्त माणगांवकरांनी समाधान व्यक्त केले आहे.

या सोहळ्या निमीत्ताने सकाळी ७ वाजता श्री व सौ. समिधा राजेश काळे या दांपत्यास देवीला अभिषेक घालण्याचा मान मिळाला. या प्रसंगी माणगांवकरांची दर्शनास मोठी गर्दी झाली. तसेच सकाळी ८ वा. श्री वाकडाई मंदिर ते हनुमान मंदिर पालखी मिरवणूक कचेरी रोड मार्गे परंपरेनुसार पोलीस ठाण्यातील देवीच्या स्थानी आली, या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वात पोलीसांकडुन पालखीस मानवंदना देऊन स्वागत केले. येथील उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनी देखील पालखीचे दर्शन घेतले. पुढे साई मंदिर - उतेखोलवाडी हनुमान मंदिर, वाकडाई नगर मार्गे पालखीने मंदिराकडे पुनः प्रस्थान केले.

देवीच्या पालखी सोबत खालु-बाज्या डिजेच्या गजरात नाचत, वाजत, गाजत, आई वाकडाई माते की जय असा देवीच्या नावाचा जयघोष करीत, उतेखोल मधिल युवा-युवती महिला-पुरुष आबालवृध्द आनंदाने बेभान नाचले, पुरुषांनी पालखी उत्सव लोगो असलेले झब्बे, टी शर्ट व मस्तकी वाकडाई देवी प्रसन्न लोगोची टोपी तसेच महिलांनी एक रंगाच्या साड्या असा खास पोषाख परिधान करुन वाजत-गाजत आकाशी भगवा ध्वज दिमाखात फडकावत रंगबिरंगी फुलांनी सजवलेली पालखी मिरवणुक जागोजागी माणगांवकर महिलांना देवीचे दर्शन आरती व ओटी भरण्यासाठी थांबत चैतन्यमयी जल्लोषात रस्त्याने हळुवार पुढे सरकत मार्गस्थ होत होती.

पालखी होळीच्या माळावर येताच दर्शनास माणगांव तालुक्यातील अनेक मान्यवर व प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते. सायंकाळी ७:०० वाजता भाविकांच्या उपस्थितीत देवीच्या महाआरतीनंतर श्री वाकडाई देवी उत्सव कमिटी, ग्रामस्थ व महिला मंडळ उतेखोल गाव व उतेखोल-वाडी गावकीने उत्साहाने सुनियोजितपणे येणाऱ्या भाविकांचे मनोभावे आदरातिथ्य स्वागत केले.

यंदा श्री वाकडाई देवी उत्सव कमिटी सन २०२६ अध्यक्ष- सुधाकर पालकर, कार्याध्यक्ष प्रविण मोने, उपाध्यक्ष - राजू सोंडकर व दिपक मढवी, खजिनदार - विजय मुंढे, सहखजिनदार- प्रकाश मोरे, सचिव- समिर जाधव, सहसचीव- सागर मुंडे तसेच सदस्य रमेश द.मढवी, रुपेश ल मुंढे, विश्वजीत जाधव, धनेश बुटे, नरेश चव्हाण, शेखर पालकर, अतिश भोरडे, रविंद्र डवले, राकेश मढवी, राजू मुंढे, हरी तातोडे, दिपक पवार, रुपेश बोडेरे, राजेंद्र काळे, गणेश जोरकर, रोशन मुरकर, रोहन मढवी, सुनील खराडे, अविनाश पाटील, अरुण (भाऊ) काळे, अच्युत मुंढे, राकेश जाधव आणि सल्लागार अनंत थळकर, आत्माराम जाधव, रामचंद्र मुंढे, शांताराम बुटे, भारतानंद गुरव, राहुल पाकेरे. नारायण मुंढे, गजानन मढवी, दत्ताराम उभारे, शांताराम जठार, सदानंद काळे. सुनिल बुटे तसेच उतेखोलगाव व उतेखोलवाडी सर्व सदस्य महिला मंडळ व ग्रामस्थांनी या सोहळ्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# श्रद्धेला सुरक्षिततेची जोड दिंडीसाठी रिफ्लेक्टर जॅकेट्स

**चौक : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून घाटमाथ्याकडे प्रस्थान करणाऱ्या भाविकांच्या दिंड्या हा श्रद्धेचा प्रवास असला, तरी तो अनेकदा जीवघेणा ठरतो. अवघड वळणे, तीव्र उतार-चढण आणि भरधाव वाहने यामुळे वाहनचालकांना रस्त्यावर चालणाऱ्या भाविकांचा अचूक अंदाज येत नाही. परिणामी छोटे मोठे अपघात घडतात आणि काही वेळा जीवितहानीही होते.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन खालापूर तालुक्यातील चौक-टेंबरी गावातून शनि शिंगणापूर येथे जाणाऱ्या दिंडीसाठी अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था (हेल्प फाउंडेशन) यांच्या माध्यमातून धनंजय गीध यांच्या पुढाकाराने एक महत्त्वपूर्ण आणि जीवनरक्षक उपक्रम राबविण्यात आला.

दिंडीत सहभागी प्रत्येक भाविकाला रिफ्लेक्टर सेफ्टी जॅकेट्स, कॅप्स आणि सिग्नल बॅटन देण्यात आली. घाटातील अंधाऱ्या आणि धोकादायक वळणांवर भाविक स्पष्ट दिसावेत, यासाठी ही साधने अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

या निमित्ताने हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांनी सामाजिक संघटनांना आवाहन केले की, पारंपरिक अन्नदानाबरोबरच आता जीवनदान देण्याच्या दृष्टीने सुरक्षा साधनांचे वाटप करणे काळाची गरज आहे. श्रद्धेला सुरक्षिततेची जोड दिल्यास अनेक अपघात टाळता येऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

दिंडी प्रमुखांनीही मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अनेक वर्षे दिंडीत सहभागी होत असताना अन्नदानाचा अनुभव घेतला; मात्र सर्वांच्या जीवनरक्षणासाठी सुरक्षा साधने देण्याचा हा पहिलाच प्रयत्न असून तो एक सकारात्मक पायंडा ठरेल. सुरक्षेचे सर्व निकष पाळण्याचे अभिवचनही त्यांनी दिले.

या उपक्रमात गुरुनाथ साठेलकर, धनंजय गीध, अमोल कदम, महेश भोसले, पंकज बागुल आणि ऋषिकेश विश्वकर्मा यांचा सक्रिय सहभाग होता. महामार्ग पोलीस आणि आरटीओ विभागालाही या उपक्रमातून सहकार्य होईल,

# जिंदल रुग्णालयामार्फत बाळसई येथे हृदय तपासणी शिबिर

**नागोठणे : बातमीदार**



रोहा तालुक्यातील नागोठणे जवळील जिंदल कंपनीच्या समुहाअंतर्गत असलेल्या बी.सी.जिंदल रुग्णालयाच्या सौजन्याने तसेच बाळसई गावचे अध्यक्ष मधुकर ठमके यांच्या सहकार्याने बुधवार दि.११ रोजी ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील बाळसई गावामध्ये हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकुण ९५ नागरीकांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये जिंदल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार यांच्यातर्फे नागरीकांची मोफत तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये नागरीकांची ईसीजी, रक्तदाब तपासणी, रक्तातील साखरेचे प्रमाण तपासून मोफत औषधे देण्यात आली. शिबिरामध्ये जिंदल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार, बाळसई गावचे अध्यक्ष मधुकर ठमके , विठ्ठल म्हसकर, सचिन भोसले , दत्ताराम पाटेकर , प्रदिप ठमके , वसंत भोसले, भिकाजी पवार, हनुमान मुंढे , हरेष ठमके , भालचंद्र जाधव, आदि ग्रामस्थांसह जिंदल रुग्णालयाचे व्यवस्थापक , कमलेश अस्थांना, किरण सुटे, दिनेश ठमके, मोहीनी जांबेकर , अदिती जंगम, शीबा वर्गीस , केतकी पार्टे, मनिष डांगी , रामदुल्हारे, संदिप चाळके, संतोष शिर्के यशवंत वारगुडे आदी कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

## शाळांमध्ये पोलीस समन्वयाचा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास या उद्दिष्टाने नवी मुंबई महानगर पालिकेच्या सीबीएससी शाळा क्र. ९३ येथील शाळा व्यवस्थापन समिती (एसएमसी) सदस्यांनी नवी मुंबई एनआरआय पोलीस स्टेशन येथे भेट देऊन वरिष्ठ पोलीस अधिकारी देवेंद्र पोळ व बाल कल्याण पोलीस अधिकारी किरण पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

या भेटीत शाळा परिसरातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा झाली. शाळेच्या प्रवेशद्वारावर कडक नोंदवही पद्धती, सीसीटीव्ही यंत्रणेची नियमित तपासणी, विद्यार्थ्यांच्या ये–जा वेळेतील सुरक्षितता, तसेच शाळेबाहेरील वाहतूक नियंत्रण यांसारख्या मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी, विद्यार्थ्यांमध्ये वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षिततेविषयी विशेष जनजागृती कार्यक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले.



सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाईन फसवणूक टाळणे, तसेच अज्ञात लिंक व ॲप्सपासून सावध राहण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यावर भर देण्यात आला. तसेच बालकांच्या हक्कांचे संरक्षण, शालेय छळवणूक (बुलिंग) प्रतिबंध, तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत कशी मिळवावी याबाबतही महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. पोलिस विभागाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी 'पोलीस मित्र' उपक्रम, स्वयंरक्षण प्रशिक्षण आणि कायदेविषयक मार्गदर्शन सत्र आयोजित करण्याची तयारी दर्शविण्यात आली.

विशेष म्हणजे शाळा व्यवस्थापन समिती ही पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या सक्रिय सहभागातून कार्यरत असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास, सुरक्षितता आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या वृद्धीसाठी सखी सावित्री (बाल सुरक्षा) आणि परिवहन समिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

**बैठका घेण्याचा निर्णय**

दरम्यान, शाळा प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांच्यात सातत्यपूर्ण संवाद राहावा यासाठी नियमित समन्वय बैठका घेण्याचा निर्णयही घेण्यात आला.

शाळेतील विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे नियोजन, देखरेख आणि प्रभावी अंमलबजावणीमध्ये समिती सक्रिय सहभाग नोंदवते. तसेच प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात येतात.

या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. एसएमसी सदस्यांनी पोलिस अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी भविष्यातही असेच सहकार्य लाभावे, अशी अपेक्षा शाळा व्यवस्थापन समितीने या वेळी व्यक्त केली.

# हिंद-दी-चादरनिमित्त सखोल स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

'हिंद–दी–चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने सखोल स्वच्छता मोहीमांमधून आदरांजली अर्पण केली जात असून त्यासोबतच लोकसहभागावर भर देत राष्ट्रीय ऐक्याचे संदेश प्रसारण केले जात आहे.

यानुसार हिंद–दी–चादर अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे साहेब यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त प्रशांत नेरकर, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या माध्यमातून सखोल स्वच्छता मोहीम घेण्यात येत आहेत.



दिवाळेजेट्टी येथे सखोल स्वच्छता मोहीम राबवून सागरी किनारा परिसर स्वच्छ करण्यात आला. या वेळी उपायुक्त डॉ. अजय गडदे, उपमुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर, स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण व सुषमा पवार, स्वच्छता निरीक्षक यांच्या समवेत विद्या प्रसारक हायस्कूलचे एनएसएस विद्यार्थी व दिवाळे ग्रामस्थ आणि स्वच्छता दूत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अशाच प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा सानपाडा गुरूव्दारा परिसर, घणसोली पाम बीच रोड परिसर, विवंता हॉटेल परिसर तुर्भे, वाशी विभागात जुहूगांव पार्कींग आणि सेक्टर १० गुरूव्दारा परिसर, बेलापूर दारावेगांव शिवमंदिर परिसर, गावदेवी मैदान परिसर अशा विविध ठिकाणी लोकसहभागातून राबविण्यातून हिंद–दी–चादर कार्यक्रमानिमित्त सेवाभाव जपत राष्ट्रीय एकात्म भावनेचे दर्शन घडले.

# सानपाडा येथे १०० हून अधिकांना मिळाले आयुष्मान कार्ड

## नगरसेविका शैला पाटील यांचा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजना आणि आभा कार्ड योजना अंतर्गत विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन सानपाडा येथील भाजपाच्या नगरसेविका शैला पाटील यांच्यातर्फे करण्यात आले होते. शैला पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात हा उपक्रम पार पडला. आयोजित केलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. १०० हुन अधिक नागरिकांनी आयुष्मान कार्डचा लाभ घेतला तसेच आभा कार्ड नोंदणी करून डिजिटल हेल्थ रेकॉर्डची सुविधा प्राप्त केली.

प्रत्येक कुटुंबापर्यंत आरोग्य योजनांचा लाभ पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती या संकल्पनेला साकार रूप देण्यासाठी सर्वांनी मिळून पाऊल उचलणे गरजेचे असल्याचे शैला पाटील म्हणाल्या.



# पर्यावरण सेवा योजनेंतर्गत शाळांमध्ये विविध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शासनाच्या महत्त्वाकांक्षी माझी वसुंधरा ६.० – पर्यावरण सेवा योजना अंतर्गत शहरातील विविध शाळांमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण जनजागृतीपर उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाबाबत जागरूकता आणि प्लास्टिकमुक्त पनवेल घडविण्याच्या उद्देशाने उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनुसार अर्कम इंटरनॅशनल स्कूल, मनपा शाळा क्र.५, मोठा खांदा, महानगरपालिका शाळा, कोळीवाडा, मनपा उर्दू शाळा, गोखले एज्युकेशन सोसायटी, खारघर, एस. डी. भगत हायस्कूल, कळंबोली, मनपा शाळा क्र. १, दी.बा. पाटील शाळा, पालिका शाळा क्र. ७, तक्का, महानगरपालिका शाळा क्र. २ या शाळांमध्ये विविध स्पर्धा व मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.



या उपक्रमांतर्गत हवामान बदल विषयक परिसंवाद, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन परिसंवाद, हवामान बदल विषयावरील निबंध स्पर्धा, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट वस्तू निर्मिती स्पर्धा विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला. हवामान बदलाचे परिणाम, प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे निर्माण होणारे संकट आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

माझी वसुंधरा ६.० ही योजना पर्यावरण संवर्धनासाठी जनसहभाग वाढविणारी महत्त्वपूर्ण मोहिम असून जल संवर्धन, वृक्षारोपण, ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन व जैवविविधता संवर्धन या घटकांवर विशेष भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून पर्यावरणाबाबत जागरूकता व जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.

पर्यावरणपूरक, स्वच्छ व हरित पनवेल शहर घडविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून नागरिकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडला. हा सोहळा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख पार पडला.

अभ्युदय ज्ञान की उडान ही सांस्कृतिक कार्यक्रमाची मुख्य संकल्पना होती. प्राचीन ज्ञानपरंपरा आणि आधुनिक भविष्य यांच्यात सेतू निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या रयतगीत व स्वागत गीताने उपस्थितांना प्रफुल्लित केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शाळेतील शिक्षकांनी त्यांच्या जीवनावर आधारित स्वरचित गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. या वेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, गायन आणि नाट्याविष्काराने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शाळेच्या वार्षिक मासिकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांनी शाळेच्या वार्षिक प्रगती अहवालाचे वाचन केले.

या वेळी इयत्ता दहावीतील प्रथम पाच विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव करण्यात आला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर आणि चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षणाला पर्याय नाही, त्यामुळे मन लावून अभ्यास करा आणि लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे नाव जगभर पोहोचवा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, ॲड आशाताई भगत, नगरसेवक प्रदीप भगत, नगरसेवक दिलीप पाटील, नगरसेविका कुसुम म्हात्रे, सिकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, किरण सुतार, निशा नायक, स्वप्नाली म्हात्रे, मुक्ता खटावकर, प्रशांत बुक्कावार, मीना देशमुख, बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते.











**पनवेल : महाशिवरात्रीच्या पावन निमित्ताने पनवेल कोळीवाडा येथील शिव मंदिर, ओंकारेश्वर मंदिर बंदर रोड, पनवेल तसेच रामेश्वर मंदिर, पनवेल येथे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाऊन भगवान शंकराचे दर्शन घेतले. यानंतर श्री संत सेवालाल नगर झोपडपट्टी रहिवासी सामाजिक विकास संस्थेच्या वतीने नवीन पनवेल येथे आयोजित संत सेवालाल महाराज जयंती उत्सव सोहळ्यालाही आमदार ठाकूर यांनी भेट देत संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन केले. या वेळी भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, भाजप पनवेल शहराध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका शिवानी घरत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, मयुरेश नेतकर, उमेश इनामदार आदी उपस्थित होते.**

# नवीन पनवेल, कळंबोलीत महाआरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, राज्यस्तरीय समागम समिती आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हिंद–दी–चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदी समागम कार्यक्रमाच्या अनुषंगाने नागरिकांसाठी मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले.



महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी नवीन पनवेल आणि कळंबोली येथील गुरुद्वारांमध्ये ही शिबिरे उत्साहात पार पडली. कळंबोली येथील गुरुद्वारा येथे आयोजित महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन उपमहापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजपचे माजी कळंबोली शहराध्यक्ष रवीनाथ पाटील, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, गुरुद्वारा अध्यक्ष दलजित सिंह, सरचिटणीस मनराज सिंग, सचिव त्रिलोक सिंग, रविशेठ पाटील, डॉ. गणेश नाईक तसेच वैद्यकीय अधिकारी व परिचारिका उपस्थित होते. दरम्यान, नवीन पनवेल येथील गुरुद्वारा येथे आयोजित शिबिराचे उद्घाटन माजी महापौर तथा नगरसेविका चौतमोल आणि नगरसेविका राजेश्री वावेकर यांच्या हस्ते झाले.

या वेळी गुरुद्वारा अध्यक्ष हरविंदर सिंह सोनू, उपाध्यक्ष हरचंदसिंग सग्गू, सदस्य दिलदार सिंह, डॉ. उषा राठोड, डॉ. भक्तराज भोईटे, महापालिका वैद्यकीय अधिकारी व परिचारिका उपस्थित होते. या मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरामध्ये जनरल तपासणी, गरोदर स्त्रियांची तपासणी अशा विविध सेवा देण्यात आल्या. तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांना आजारांवरील मार्गदर्शन व वैद्यकीय सल्लाही देण्यात आला. या दोन्ही शिबिरांचा सुमारे ६०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.

**पनवेल : पंचायत समिती सदस्य रंजना वास्कर व सदाशिव वासकर यांच्या वतीने कुंडेवहाळ येथे महाशिवरात्री उत्सव आयोजित करण्यात आला होता. या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.**

